मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

जानेवारी १९५१

कै. भाऊजी दप्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

☆

संपादक :
वामन चोरघडे.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

☆

कै. भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
३७३९५
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०.२.१४
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वर्ष सहावें
अंक पहिला

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

ऋग्वेदातील साहित्य ....

मृदुला ....

संघवार्ता ....

मध्यप्रदेशाची राजभाषा ....

घटना दुरुस्ती ....

युगवाणी ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष सहावें] **युगवाणी** [अंक पहिला

जानेवारी १९५१

वार्षिक वर्गणी पांच रु. समासदांना विनामूल्य समासदांची वर्गणी ३ रु.

संपादकीय—

सरदार वल्लभभाई पटेलांच्या नांवामागेहि गेल्या १५ डिसेंबर १९५० पासून "कै." हें अभद्र अक्षर लागूं लागलें. भारताच्या भाग्यविधात्यांपैकी एक अतिमहत्त्वाचा घटक गेला. थकून शिणून जर्जर झालेलें त्यांचें शरीर अनंतांत विलीन झाले खरें पण त्यांच्या खंबीर व्यक्तित्वाने त्याला जो आकार आणला होता तो भारताइतकाच विशाल असल्याने त्याचा कणकण भारताच्या भूमींत समावला आहे. त्यांच्या जिवंतपणी त्यांचें नुसतें नांव दुर्दम्य उद्दाम शक्तींना नांगी टाकावयास लावीत होतें. त्या शक्ति त्यांच्या अनुपस्थितीनेहि मान वर करणें शक्य नाही. कारण महान् आत्म्याची हाडेंहि शस्त्रासारखीं वापरलीं जात हें त्यांना माहित आहे.

त्यांच्या कृतीला, त्यांच्या उक्तीला, त्यांच्या स्मृतीला, त्यांच्या दराऱ्याला शतशत प्रणाम ! सरदार गेले, सरदार अमर आहेत !!

x x x

'युगवाणी' ची जबाबदारी अजून माझ्यावरच आहे आणि ती नव्या उमेदीने पार पाडण्यासाठीं मी आशेचे कण गोळा करीत आहें. समासदांकडून मला प्रोत्साहन मिळण्याची आशा आहे. गेल्या वर्षीचा संघाच्या समासदांचा आंकडा निराशाजनक नाही आणि यापुढे संघाचें समासदत्व नव्या वर्षीच्या उत्साहाने वाढेल यांत शंका नाही.

'युगवाणी'चा हा अंक १९५० सालच्या समासदांकडे 'भेट' म्हणून जात आहे. कारण त्यांचें समासदत्व संपलें. त्यांनी तीन रू. वार्षिक वर्गणी भरून १९५१ करितां संघाचें समासद व्हावें म्हणजे पुढील महिन्यापासून त्यांच्याकडे नियमित अंक जाईल. वर्गणी माझ्याकडे पाठविली तरी चालेल, रीतसर पावती पाठविण्यांत येईलच.

x x x

विदर्भ साहित्य संघाला जागा मिळाली आणि लोकनायक बापूजींनी ती नव्या वर्षाच्या आरंभदिनीं पाहून आशीर्वाद दिला. लोकनेत्याचे बोल सर्वांना आंबेमोहरा सारखे आशादायक वाटले. इमारतीची वीटहि लवकरच ठेवली जाईल. तिला सर्वांचा हातभार लागणे अवश्य आहे आणि तो लागेल अशी खात्री आहे.

विदर्भसाहित्यसंघाची जिवंत इमारत म्हणजे समासदांची संख्या होय हें सत्य क्षणभरहि डोळ्याआड होऊं देतां उपयोगी नाही. तसें झालें तर नुसती इमारत मराठी भाषेचें कार्य करूं शकणार नाही.

नागपूर १४-१-५१.

वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

...ाझी दृष्टी सहज पुढे सरकत होती. खेदाचें अप्रसन्नतेचें एखादें ...ठ लागलेलें नव्हतें.

आतां नव्या वस्तीतली बाजारपेठ लागली. पहिल्याच दुकानावर 'थंडीच्या ...नसाठी लोकरीच्या कपड्यासाठी खास रिडक्शन सेल' अशी पाटी लागलेली दिसली. मला नीट आठवतें कीं पावसाळ्याचें सुरवातीस याच पाटीच्या ठिकाणीं 'पावसाळ्यासाठी रेनकोट आणि छत्र्या यांचा भरपूर मनपसंत स्टॉक' अशी पाटी मीं पाहिली होती. अन् मला खात्री आहे कीं 'उन्हाळ्यासाठी मलमली कपड्यांचा जंगी स्टॉक' अशीहि पाटी या दुकानाजवळ असेलच आणि वेळ येतांच ती बाहेर डोकावेलच. ज्या काठ्यावर पूर्वी छत्र्या टांगल्या होत्या त्याच कांठ्यावरुन आतां लोकरीचीं ब्लँकेट्स सोडलेलीं होतीं. ज्या हँगर्सवरून रेनकोट लोंबकळत होते त्यावरून आतां स्वेटर्स हेलकावत होते. त्या निर्जीव काठ्या—हँगर्ससाठींसुद्धा ऋतुबदल झाला होता. सौंदर्य प्रसाधनांची सुंदर मांडणी 'शोकेसेसमधून' केलेली दिसली. व्यापाऱ्यांच्या दृष्टीनेहि ऋतू बदलला. कुठे कुठे सुद्धा चिंतेचा शिंतोडा उडालेला दिसला नाही. विजेच्या नळकांड्यांतून प्रकाशाचे स्रोत पाझरत होते. देवाण् घेवाण् चालली होती.

बाजारपेठहि संपली. नव्या वस्तीच्या शेवटाला मी आलों. एक वेगळीच वस्ती दिसूं लागली. अगदी बैठीं घरें, आंत माणूस उभा राहणें शक्य नाही अशीं. वारा पाझरणाऱ्या तट्ट्याच्या भिंती. छपराला कामठ्या, हाताला सांपडतील त्या पत्र्याचे निरनिराळ्या आकाराचे तुकडे, अन् पोत्यांची पटकुरें वापरलेलीं. घरापुढे लहानसेंच अंगण. त्यांतच खोपटावर लपेटलेला सांडपाण्याने पोसलेला वेल. त्या वेलाची पिवळीं धमक फुलं ओसरत्या प्रकाशांत फिकट व्हायला लागलीं होतीं. प्रत्येक खोपट एकेका खोलीचें—जसें एकसंधी भांडें किंवा पालथा टाकलेला द्रोण. तेंच शयनागार, तेंच कोठागार, तोच मुदपाकखाना, तोच दिवाणखाना, तोच रंगमहाल आणि तीच प्रसूतीची खोली. अखेरचा श्वास सोडायचा तोहि तिथेच. जन्माचें लेणें आणि मृत्यूचें देणें त्याच ठिकाणीं घ्यायचें, द्यायचें. कमनशिबी जातीच्या माणसाच्या जीवनाच्या एकांकिकेची ही रंगभूमी, पण तिच्यांत त्यांतल्या त्यांत शक्य तेवढी सजावट केलेली दिसली. खोपटापुढचें लहानसें अंगण पांढुरक्या मातीने किती सुंदर सारवलें होतें. आंत रहाणाऱ्याच्या सौंदर्यदृष्टीने दाराच्या चौकटीभोंवती गेरूच्या आणि चुन्याच्या ठिपक्यांची नक्षी काढलेली होती. कांही खोपटाबाहेर खुज्या खाटा उभ्या होत्या. खोपटाच्या उंचीच्या प्रमाणांतच त्यांची उंची असायची. सुखवस्तू वर्गाच्या पलंगाशी तुलना करतां या खाटा सरपटणाऱ्या पालीप्रमाणेच भासत होत्या. कांही खोपटांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माध्यांतून किंचित असा धूर वर सरपटत जात होता. खोपटे-लेला जीवांची भुकेची सांज झाली होती. अन्नपरब्रह्माच्या भेटीची याहि आतुरता होतीच, दिवसभराच्या श्रमाने पोलादाच्या कांबेसारख्या ____ शरीराचे घट्टकट्टे श्यामल वर्णाचे श्रमिक लहानशा दगडावर बसून पा·३ रु. पोटऱ्या दगडाच्या चिपेने घांशीत होते. हे जीव आपल्या जीवनांत तृप्त ६— की अतृप्त होते ? परंतु फिरत असतांना आतांपर्यंत पाहिलेल्या दृश्यांतून जें जीवन प्रतीत झालें त्यापेक्षा कांही तरी खिन्नखिन्नसें मला दिसतें असें एक विचाराचें शल्य मला हळूंच टोचलें. विचाराच्या भोवऱ्यांत मन गरगरूं लागलें. हातांतल्या काठीचा चाळा कमी झाला. भिरभिरणारी नजर कांहीशी स्थिरावली. ती कांही तरी आंत आंत शोधूं लागली. दिसलेल्या दृश्याच्या सूत्रांचा एखादा धागा मनांतल्या गुंताळ्यांतील धाग्याच्या कापसाचाच होता कीं काय हें ती शोधूं लागली. ही वस्ती कुणाची होती ! नुकत्याच पाहिलेल्या टुमदार घराचे कारागीर झोपड्यांतून रहात होते. घर बांधीपर्यंतच ते त्याचे धनी. वास्तुशांत झाली, नव्या घराला आंब्याचें तोरण लागलें, आंतल्या भिंतीवर कुंकवाचें स्वस्तिक उमटलें, वास्तुशांतीच्या निमित्ताने थोडसें गोडधोड पोटांत पडलें कीं यांचा अवतार संपला, हक्क संपला, गरज संपली. हाताचें कसब यांचें, मात्र त्यापासून लाभणाऱ्या आनंदाचे धनी दुसरेच. माणसाची करणी अतर्क्य खरीच.

आतां समोर गाडीचा पूल दिसूं लागला. या पुलाखालून मला पलीकडे जायचें होतें पण माझे पाय अडखळूं लागले. डाव्या बाजूचें मारुतीचें देऊळ आलें. कळ फिरल्याप्रमाणे मी देवळाच्या चौथऱ्यावर जाऊन बसलों. शेंदूर फांसलेली मारुतीची प्रचंड मूर्ति दिसली. शक्तीचें हें दैवत आतांपर्यंत कितीतरी लोकांच्या निरनिराळ्या नवसांना पावलें असावें, कारण मारुतीपुढे कितीतरी अघेल्या, पावल्या ठोकलेल्या दिसल्या. भक्तीचें शास्त्र गहन असलें पाहिजे. वर मारुतीकडे नजर गेली. चांदीच्या पत्र्याचे चकचकीत डोळे त्याला लावलेले दिसले. कुणातरी मोठ्या माणसाच्या नवसाला हे मारुतिराय पावले असावेत. त्याच्या वतनवाडीला वारसदार लाभला असावा. त्याच खुषींत त्याने हा ‘ चांदीचा चष्मा ’ देवाच्या ‘अधू’ दृष्टीसाठी योजला असावा ! फोडलेल्या नारळाच्या करवंट्या आणि शेंड्या इकडे तिकडे पडल्या होत्या. खोबऱ्याचे कांही तुकडे मारुतीपुढें नैवेद्य म्हणून पडलेले दिसले. बाजूलाच मुंग्यांची लांबवर रांग लागली होती. न खाणा देवाला नैवेद्य दाखवणें फारच सोयीस्कर ! त्याच्यापुढे थोडसें ठेवावें. तो खातो असं समजून समाधान मानावें, परंतु भुकेनें पेट घेतलेल्या मानवी दैवतांपुढें ?

गाडीचा पूल शंभर दीडशें फुटावर आला. पुलाखालीं नजर गेली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

ंधारांत उघड्यावर चुली पेटलेल्या दिसल्या. तुम्ही आणि मी ज्याला तसली एकहि चूल त्यांत नव्हती, परंतु चुलींचें काम भागविणारी, ाझ्या चुलीच्या वंशाच्या आद्य संस्थापिकेच्या तोंडवळाची त्यांतली प्रत्येक ी. पूर्वी प्रचलित असलेल्या मातृसत्ताक व्यवस्थेचा हा अवशेष असावा. ाउलीचें घराणें अजून चालूंच आहे. ही माऊली प्रसन्न असेल तरच माणूस-ात जगेल. चुलीमधून धगधगणाऱ्या नाचत्या ज्वाळांच्या थरथरत्या प्रकाशांत माणसांच्या आकृति दिसूं लागल्या. कुठले तरी 'क्ष किरण' त्यांच्यावर पडल्यागत वाटलें. ते नुसते चामड्याने कसेबसे लपाविलेले हाडांचे सापळेंच होते. हाडाच्या सांप-ळ्यांचा घोळका पाहून प्रथम जरा भीतिच वाटली. शरीराच्या मानाने मोठीं डोकीं असलेलीं मुलें, तेलाचा स्पर्श न झाल्यामुळे पिंजारलेल्या केसांच्या स्त्रिया आणि डोळ्याच्या खोबणींतून बाहेरच्या जगाकडे भेदून टाकणाऱ्या नजरा रोखणारे पुरुष, यांचा तो तांडा खास माझ्याच जातीचा—माझ्याच रक्ताचा, हाडा मासांचा होता. चुलीवर बहुतेक मडकींच ठेवलेलीं दिसलीं, मधूनच एकादें अॅल्युमिनमचें काळवंडलेलें भांडें दिसत होतें. भिक्षा मागून आणलेल्या आंबुस अन्नाला विस्तवाचा चटका देण्याचा प्रयोग चालूं असावा. त्याचा एक प्रकारचा उग्र आंबुस दर्प नासिकेंतून माझ्या पोटांतील साऱ्या आम्ल कटु रसाला खेचूं लागला. माझ्याच जातीचे ना हे ? यांच्यातील अठरा वर्षांवरील 'सज्ञान' जिवंत सांपळ्यांना मताधिकार मिळाला आहे ना ? यांची मतें कोणाचीं असतील बरं ? सध्यां तरी सुग्रास अन्नालाच एकमताने निवडूं इच्छिणारा हा मतदार-संघ ! पण निवडणुकीच्या दिवशीं काय ती, यांची आणि मी खातों तसल्या अन्नाची क्षणमात्र गांठ पडेल, कारण त्या दिवशीं हे धनको असतील आणि आम्ही भिक्षू असूं. तेवढा अवसर उलटला, तेवढें नाटक संपलें कीं रात्री नाटकांत राजाचें काम करणारा नट दिवस उजाडतांच विडीसाठी कंपनीच्या मालकापुढे हात पसरतो तसेंच व्हायचें ! नदीच्या पात्रांत दुकानें ठोकणाऱ्या चिल्लर दुकानदारांना, टुमदार घरांतून राहणाऱ्या सुख-वस्तु लोकांना, विजेच्या नळकांड्यांतून स्रवणाऱ्या प्रकाशांत देवाण घेवाण करणाऱ्या व्यापाऱ्यांना, खुजा खाटा खोपरापुढे ठेवणाऱ्यांना ऋतूंत बदल झाला होता मग या सांपळ्यांसाठीं हा ऋतू बदलला नसेल कां ? होय, यांच्यासाठी सुद्धा ऋतुंत बदल झाला होता खास. कारण आतां पर्यंत चार महिने रात्रीं पाऊस पडला म्हणजे याच पुलाखालून पाण्याचे लोट वहात असतील. ते लोट वाहून जाई पर्यंत आपलीं शय्यावस्त्रं हातांत घेऊन ते झोपेंसाठीं रात्रभर तिष्टत उभे रहात. ज्या वेळेस खिडकींतून पावसाचे शिडकावे आंत येऊं नयेत म्हणून मी रात्रीं खिडकी लावीत असेन त्याच वेळेस हे झोपेंतून उठून उभे रहात असतील. असा प्रसंग त्यांना आतां आठ महिने येणार नव्हता. ऋतूंत बदल झाला होता. पाण्याचा लोट पुलाखालून वहायची तूर्त भीति नव्हती. पण मला वाटतें त्यांना वेगळीच भ्रांत पडली असावी. हेमंत आणि शिशिर यांच्या तीव्र शीतहारांचें संधान त्याना झेलायचें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होते. जिथे देहाच्या आंत कांही ढकलण्याची भ्रांत तिथं देहावर आव सोय कुठली ! खूप काटक्या जमवायच्या आणि त्यांच्या शेकोटीच्या ऊ शरीर लोटून द्यायचे एवढेंच त्यांना माहीत. पहांट झाली, शीतशरांची श लागलीं म्हणजे कांसवाप्रमाणें अंग चोरायचें, आपलेच लाकडी पाय पेटीपाशीं घ्यायचे आणि लवकरच सूर्याचे उबदार हात आपल्याला गोंजारतील विचारांत डोळ्यांच्या कांचावर वरच्या कातड्याचे पडदे ओढायचे इतक्यापुरता त्यानांहि ऋतू बदलला होता. विषयांतर म्हणजे विश्रांति ही आमची धारणा तर चिंतांतर म्हणजे ऋतू बदल ही यांची धारणा. याहि अवस्थेंत कांही सांपळे हंसत आहेतच बघा ! कशाचें हंसू असेल? मी रहात असलेल्या समाजाचा एक थवा माझ्याकडं येत आहे असा मला भास झाला. थव्यांतली प्रत्येक व्यक्ति पुष्ट दिसत होती, तिच्या अंगावर भरपूर वस्त्रें होतीं. आपल्यापैकीच एक म्हणून तो थवा माझ्याकडं येत असावा. मी यांच्यातला तर पुलाखालचे हे सांपळे कुणांतले? हे आले तरी कुठून! त्यांच्याकडे हा थवा कां जात नाही? माझें मन चांगलेंच गरगरूं लागलें. माझी काठी खालीं आपटली. चुलीच्या प्रकाशांत सुंदर पॉलिश केलेली माझी काठी मेलेल्या सांपाप्रमाणे चकाकत होती. कांठी पडल्याने सारे सांपळे दचकून उभे राहिले होते. मी माझी काठी उचलली. खाली वाकतांच खिशांतली पावली जमीनीवर पडली. प्रकाशांत तीहि चकाकली पण माझा हात तिला शिवूं शकला नाही. एखाद्या गुन्हेगाराने गुन्हा करतांच गुन्ह्याच्या ठिकाणापासून जसें शक्य तितकें दूर पळावें त्याप्रमाणे तिथून मी परतलों डोक्यावरील दूर अंधारांत कुणा पांखराने पंखाने वारा कांपल्याचा आवाज माझ्या कानावर आला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जानेवारी
१९५१

ऋग्वेदांतील साहित्य

गणेश त्र्यंबक देशपांडे

*

देवानां नु वयं जाना प्रवोचाम विपन्यया ।
उक्थेषु शस्यमानेषु यः पश्यादुत्तरे युगे ॥
(ऋग्वेद, १०।७२।१)

"आपल्या व त्याचप्रमाणे बऱ्याच युरोपीयांच्या सामान्य पूर्वजांचे प्राचीनतम स्थितिबोधक वाङ्मयांतर्गत अवशेष या नात्याने वेदांना जगाच्या वाङ्मयेतिहासांत अग्रस्थान देणें जरूर आहे, ही गोष्ट युरोपिय पंडितांनीहि कबूल केली आहे. आपणा हिंदूंचें ज्ञान, विचार व भावना यांस वेदामुळेच निश्चित स्वरूप झालें आहे. आज कित्येक हजार वर्षे कोट्यवधि भारतीय वेदाक्षराला ईश्वर वाणी मानत आले आहेत. वेद हे भारतीय वाङ्मयांत प्राचीनतम असल्याने भारतीयांचा आध्यात्मिक जीवनक्रम व संस्कृति या संबंधाचें यथार्थ ज्ञान वैदिक वाङ्मयांत गति करून घेतल्याशिवाय मिळणार नाही" ज्ञानकोशकारांनी वेदवाङ्मयाचे महत्त्व याप्रमाणे वर्णन केलें आहे. वेदवाङ्मयांत ऋग्वेद हा सर्वांत प्राचीन ग्रंथ. आपल्याला धर्मग्रंथ म्हणून व सर्व जगाला मानवजातीच्या इतिहासाचा आद्यग्रंथ म्हणून ऋग्वेद महत्त्वाचा आहे; आणि या दृष्टीने त्याचें अध्ययन झालेलें व होतहि आहे.

साहित्य ग्रंथ म्हणूनहि ऋग्वेदाचा अभ्यास करणें शक्य व अवश्यहि आहे. ऋग्वेदांतील सूक्तें लहान मोठीं काव्यें आहेत. या दृष्टीने ऋग्वेदाचा अभ्यास केल्यास धार्मिक व सांस्कृतिक महत्वाबरोबरच ऋग्वेदाचें साहित्यक मूल्यहि अजमाविता येईल. ऋग्वेदांत काव्य नाही असें कोणीहि म्हणत नाही; पण त्या काव्याचा फारसा विचारहि कोणी करताना दिसत नाही. संस्कृत साहित्याच्या इतिहासाचीं पुस्तकें पाहावींत व त्या साहित्येतिहासांत ऋग्वेदीय साहित्याला किती गौण स्थान दिलेलें असतें तेंहि पाहावें. प्राचीन इतिहासाचे संशोधक, तसेंच समाजशास्त्र, भाषाशास्त्र, किंवा दैवतेतिहासशास्त्र इत्यादि शास्त्रांच्या अभ्यासकांनी ऋग्वेदीय काव्याकडे लक्ष न दिलें तर एकदां चालेल. परंतु साहित्येतिहासाच्या लेखकांनीहि तसेंच केलें म्हणजे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. ऋग्वेदांतील काव्याविषयी लिहिताना, फारफार तर कांही सुंदर उषःसूक्तें, अक्षदेवनासारखीं कांही लौकिक सूक्तें आणि थोडीशीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तत्वज्ञानपर सूक्तें एवढ्यासंबंधीं लिहिलें म्हणजे ऋग्वेदाचें साहित्यिक मूल्य संपलें अशा प्रकारची वाङ्मयेतिहासलेखकांची प्रवृत्ति झाल्यासारखी दिसतें. आणि एका दृष्टीनें तें साहजिकहि आहे. कारण, हीं सूक्तें पुरोहितांनी यज्ञाकरितां रचलीं अशी आपण एकदा समजूत करून घेतली म्हणजे मग त्यांत काव्य कोठून सांपडणार ? मोठमोठ्या युरोपीय पंडितांनी या सूक्तावर 'नीरस आणि रटाळ' म्हणून शेरा मारला; कित्येकांनी त्यांना समाजाच्या बाल्यावस्थेंतील बालिश बडबड म्हणून म्हटलें; आणि आम्हीहि तेवढ्यावरच समाधान मानलें. मग ऋग्वेदांत फारसें साहित्य कोठून येणार ? पण वस्तुस्थिति तशी नाही. साहित्य दृष्टीने पाहिल्यास ऋग्वेदांत उच्च प्रतीचें साहित्य सांपडतें; तें रटाळ नीरस किंवा बोबड्या बोलासारखें निरर्थक नाही याची खात्री पटते; आणि धर्म व तत्वज्ञानाबरोबरच प्राचीन ऋषींनी आपल्याला "अक्षर वाङ्मयहि" दिलें याचीहि जाणीव होऊन आपलें हृदय आश्चर्य, आनंद व आदर यांनी भरून येतें.

ऋग्वेदाकडे साहित्य दृष्टीने पाहण्याचा हा पाहिलाच प्रयत्न नाही. माझे मित्र सागर विद्यापीठाचे प्रो. वी. एस्. शास्त्री यांनी या दृष्टीने अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. पण मराठींतून या दृष्टीने फारसें लिहिलेलें नाही. म्हणून हा उपक्रम मी येथे करीत आहें. ऋग्वेदांत काव्याचीं गमकें कशीं सांपडतात एवढी एकच गोष्ट येथे थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ऋग्वेदाच्या अभ्यासकांस यांत फारसें नवीन न आढळलें, तरी मूळांतील गोष्टींचें स्पष्टीकरण झाल्याचें दिसेल अशी आशा आहे.

ऋग्वेद संहिता हा एककर्तृक ग्रंथ नाही. अनेक ऋषींच्या सूक्तांचा तो संग्रह (Anthology) आहे. पूर्वी ऋग्वेदाच्या दोन संहिता असाव्यात. पण आज आपणास एकच उपलब्ध आहे. जिला आपण आज ऋग्वेद संहिता म्हणतो तिचें ऐतिहासिक व शास्त्रीय नांव "शाकल संहिता" असें आहे. दुसरी संहिता "बाष्कल संहिता" या नांवाने ओळखली जात होती. ती आज उपलब्ध नाही. हल्लीच्या उपलब्ध संहितेत एकंदर १०२८ सूक्तें असून एकंदर ऋक्संख्या १०५५२ (वालखिल्य सूक्तांसहित) आहे. हीं सूक्तें निरनिराळ्या ऋषींनी रचलीं. बऱ्याच काळापर्यंत मुखपरंपरेने पिढ्यान्‌पिढ्या तीं चालत आलीं. अखेर त्यांचा एकत्र संग्रह करण्यांत आला. तो संग्रह म्हणजेच ऋक्संहिता होय. ऋचांची संहिता ती ऋक्संहिता. सूक्तांचें हें संहितीकरण वेदव्यासांनी केलें अशी आपली समजूत आहे. पूर्वी वेद एक होता. वेदव्यासांनी त्याचे चार भाग केले व आपले शिष्य पैल, वैशंपायन, जैमिनि आणि सुमंतु यांना पढविले अशी कथा श्रीमद्भागवतांत आहे. (भा. १२ । ६ । ४९-५३)

वैदिक मंत्रांचे संहितीकरण यज्ञकर्माच्या अनुषंगाने झालें. व ऋग्वेद हा यज्ञांतील ऋत्विजांपैकीं होत्याचा वेद म्हणून मानल्या गेला. पण येथे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की संहितीकरण जरी यज्ञाच्या अनुषंगाने झालेलें असलें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरी मंत्र कांही यज्ञाच्याच अनुषंगाने झाले नाहीत. मंत्र आणि संहिता एककालीन नाहीत. एवढेंच नव्हे, तर ते संहितेपेक्षा बरेच प्राचीन आहेत. मंत्राच्या पुरातनत्वाचा निर्देश पुराणांत आढळतो. त्यांच्या मते वेद जगदारंभी झाले पण संहिता त्रेतायुगारंभी झाल्या.[१] ही गोष्ट येथे मुद्दाम सांगण्याचें कारण असें की मंत्रद्रष्टे आणि संहिताकार हे वेगळे असल्याने, आणि त्यांच्यामध्ये बराच काळ गेला असल्याने सूक्तकारांचा सूक्तें रचण्यांतील हेतु व संहिताकारांचा संहितीकरणांतील हेतु एकच आहे असें मानतां येत नाही. संहिताकारांच्या वेळी सूक्तांतलि मंत्र यज्ञांत वापरले जात होते म्हणून सूक्तें यज्ञाकरितां रचलीं गेलीं असें म्हणतां येत नाही. ऋग्वेद सूक्तांचें वाङ्मयीन मूल्यमापन करतांना सूक्तकारांचाच हेतु लक्षांत घेऊन केलें पाहिजे ही गोष्ट स्पष्ट आहे.

परंतु ओल्डनबर्ग या पंडिताने ही गोष्ट लक्षांत घेतल्यासारखी दिसत नाही. विशिष्ट यज्ञांच्या वेळीं उपयोगी पडावींत म्हणून हीं सूक्तें ऋत्विज लोकांनी रचलीं असें तो म्हणतो. त्याच्या दृष्टीने हीं सूक्तें निर्माण करणाऱ्या लोकांचा आध्यात्मिक ऱ्हास होत चालला होता. "ऋत्विज व त्यांनी देवतांना केलेलीं आवाहनें, भोंवती दर्भ मांडून तयार केलेलीं यज्ञकुंडें, यज्ञांत दिलेले हविर्भाग घेण्यासाठी, व मादक सोमरस पिऊन अंगी धैर्य व दिव्य शक्ति आणण्यासाठी रथांना घोडे जुंपून आकाशांतून धावत येणारे रानटी देव, व त्यांना आवाहन करणारे रानटी ऋत्विज या खेरीज ओल्डनबर्गला या सूक्तांत कांहीच दिसत नाही तो म्हणतो, 'ऋग्वेदांतील ऋषींनी पूर्वीपासून चालत आलेल्या तऱ्हेने भव्य अशा सोमयज्ञाचीं सूक्तें रचलीं, परंतु या सूक्तांचा हेतु देवाविषयीं ज्ञान देण्याचा नसून केवळ त्या देवाचीं स्तुतिस्तोत्रें गाण्याचा असल्याने एखाद्या बहुभाषी स्तुतिपाठका प्रमाणे मन मानेल तीं मोठमोठीं लांबलचक विशेषणें त्यांनी या देवाला दिलीं आहेत. लोकांच्या मनाचा ओढा सामान्यतः भडक आणि भपकेदार चित्राकडे असल्याने त्यांच्या हातून साहजिकच वरील प्रमाणे स्तुति झाली आहे.' वरील प्रमाणे सूक्तांच्या हेतूचें वर्णन करून ओल्डन बर्गने असा शेरा मारला आहे की "ऋत्विज लोकांच्या खेरीज इतरांकडून असें काव्य निर्माणच होणार नाही."[२]

परंतु सर्वसूक्तें यज्ञाकरितांच रचलीं आहेत असें म्हणणारा ओल्डनवर्ग हा जेव्हा उषःसूक्तांकडे वळला तेव्हा त्याला असें म्हणता येईना. उषःसूक्तांविषयीं

---

१ श्रीमद्भागवत ९।१४।४८-४९. तसेंच महाभारतांत शांतिपर्वात असा श्लोक आहे—"ततस्त्रेतायुगं नाम त्रयी यत्र भविष्यति ।
प्रोक्षिता यज्ञपशवो वधं प्राप्स्यन्ति वै मखे ॥"

२ हा उतारा ज्ञानकोशांतून घेतला आहे. (म. ज्ञा. को. खंड २, पान २८). ओल्डनबर्गने 'Religon des, Veda' हा ग्रंथ लिहिला त्यांतील हें मत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बोलताना, "हीं सूक्तें मात्र गूढ अशा याज्ञिक छलापासून बचावलीं आहेत आणि याज्ञिक सूक्तांत न दिसणारें काव्यसौंदर्य या सूक्तांतून प्रतीत होतें" असेंच त्याला म्हणावें लागलें.[३] वस्तुस्थिति अशी आहे की, या पंडिताने उषःसूक्तांबद्दल जें म्हटलें तें बहुतेक सर्वच संहिते बद्दल खरें आहे. लेख लांबेल या भीतीने प्रत्येक विधानाची चर्चा करणें टाळावें लागत आहे[४] तरीहि असें खास म्हणावेसें वाटतें की ओल्डनबर्गचा दृष्टिकोन सर्वस्वी चुकला आहे. एकतर सर्वच सूक्तें यज्ञाकरितां लिहिलेलीं नाहीत. उषस्, सूर्य, सवितृ, विष्णु, वरुण, ब्रह्मणस्पति यांचीं सूक्तें तसेंच तत्त्वज्ञान व लौकिक विषयावरील सूक्तें यांचा यज्ञाशी संबंध नाही. सोम सूक्तांपैकीं बरीचशीं सूक्तें "सांघिक गाण्यासारखीं" वाटतात. सोमवल्ली कुटून रस तयार करीत असतां म्हटलीं जाणारीं तीं गाणीं असावींत. कोणतेहि मेहनतीचें व किचकट काम करितांना कामकरी गाणीं म्हणतात तसल्या प्रकारचीं अनेक गाणीं सोममंडळांत आहेत हें सहज लक्षांत येतें. इंद्रसूक्तांपैकीं यज्ञविषयक कोणतीं व इंद्राच्या पराक्रमाचे पोवाडे कोणते हेंहि चटकन ओळखतां येतें. अग्निसंबंधी सुद्धा दोन प्रकारचीं सूक्तें आहेत व त्यांतील फरक दिसून येतो. अग्नि हा प्रत्येक घरांत राहणारा त्यांचा निकटचा देव. त्याला केवढ्या भक्तीने आणि आपुलकीने ऋषींनी आळविलें आहे ! मुलगा ज्या आपुलकीने प्रेमळ पित्याकडे जातो, तेवढ्याच प्रेमाने ऋषि अग्निला आळवितात. ऋग्वेदाचें अगदी पहिलें सूक्तसुद्धा या गोष्टीची साक्ष देईल. या सर्व गोष्टी सूक्तांचें वाचन करीत असतां विनायास दिसतात. मात्र निराग्रह बुद्धीने पाहिलें पाहिजे.

ऋग्वेदांतील यज्ञ विषयक सूक्तें घेतलीं तरी त्यांत सुद्धा काव्य दिसून येईल. कोणत्याहि गोष्टीचें उदात्त स्वरूप काव्यद्वारा प्रकट करणें हा तर वैदिक ऋषींचा विशेष आहे. 'साध्याहि विषयांतून मोठा आशय' प्रत्ययाला आणून देणें हा जर कवि व तत्त्वज्ञ यांचा बाणा असेल तर वैदिक ऋषींनी तो पुरेपूर सांभाळला आहे. उदाहरणाकरिता 'यूपसूक्त'च [३-८] घ्याना. हें सूक्त तर सर्वस्वी यज्ञांतील यूपासंबंधीच आहे. पण त्याचा ऋषि काय म्हणतो तें पाहा. तो एका लाकडाच्या खांबाचें वर्णन करीत नाही. त्याला त्या ठिकाणीं 'यज्ञध्वज' दिसतो. आणि जसजसा हा यज्ञध्वज पुढे जाईल तसतसे सहस्त्र शाखांनी आम्ही वृद्धिंगत होऊं असें तो ऋषि-विश्वामित्र-आत्म विश्वासाने सांगतो.[५] यूप आणि अग्नि हे ऋषींचे यज्ञ केतु म्हणजे यज्ञध्वज होते. आणि त्यांना पुढे करून

---

३ They "steer clear of the mystic sophistries of sacrificial technique; and they have a charm that is wanting in sacrificial hymns proper."—Religon des Veda, page 237.

४ ओल्डनबर्गच्या मताचें सविस्तर खंडन प्रो. शास्त्री यांनी केलें आहे.

पाहा--"Origin of the songs of Rigueda" Nagpur University Journal, 1944.

५ सजोषसो यज्ञमवन्तु ऊर्ध्वं कृण्वन्त्यध्वरस्य केतुम् ॥ (३-८-८)

वनस्पते शतवल्शो वि रोह सहस्त्र वल्शा वि वयं रुहेम । (३-८-११)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

त्यांनी आपल्या संस्कृतीचा प्रसार केला ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे यज्ञसूक्तांतीलहि रहस्य कळतें आणि सौंदर्यहि प्रत्ययास येतें. आजहि आपली झेंड्याविषयीं अशीच भावना नाही काय ? वैदिक ऋषींची ही भावना आणि १५ ऑगस्ट १९४७ ला घटना समितींत पंडित जवाहरलाल नेहरूंनी व्यक्त केलेली आपल्या राष्ट्रीय झेंड्या बद्दलची भावना यांचा बरोबर विचार केला म्हणजे वैदिक ऋषींच्या यज्ञविषयक सूक्तांचें हि महत्त्व कळेल. यज्ञप्रक्रियेतूनहि असे विचार व्यक्त करणाऱ्या अंतर्दर्शी विभूतींना जर केवळ स्तुतिपाठक म्हणावयाचें, तर मग कवि कोणाला म्हणावें हा प्रश्नच आहे.

वैदिक वाङ्मयाचा दुसरा पंडित ब्लूमफील्ड आहे. त्याचेंहि मत जवळजवळ ओल्डनबर्गसारखेंच आहे. फरक इतकाच की ऋग्वेदांतील काव्याचीहि त्याला जाणीव आहे. ऋषींनी यज्ञाकरिता स्तुतिपाठ रचले असे ओल्डनबर्ग म्हणतो, तर ऋषींनी यज्ञाचें काव्यीकरण केलें असें ब्लूमफील्ड म्हणतो. त्याच्या मतेंहि ऋग्वेदीय काव्य सामान्यतः नीरस व कंटाळवाणेंच आहे. पण याज्ञिकांचा बालिशपणा व परंपरेची बुरशी जर त्यांतून काढून टाकली तर वैदिक सूत्रांना त्यांच्यांतील सौंदर्यामुळे जागतिक वाङ्मयात स्थान मिळेल, असेंहि त्याला वाटतें. त्याच्या मतें वैदिक सूक्तांचा मुख्य हेतु यज्ञ आहे व त्यांतील काव्य गौण असून यज्ञाच्या अनुषंगाने आलें आहे. या मताचें परीक्षण येथे करण्याचें कारण नाही. सूक्त रचनेचा हेतु कोणता होता याचें विवेचन पुढे येईलच.

परंतु वैदिक पंडितांचा दुसराहि एक वर्ग आहे. त्यांच्या मतें वैदिक सूक्तें ऋषींच्या भक्तियुक्त अंतःकरणांतून अंतःस्फूर्तीने निघालीं आहेत. तीं ऋषींच्या भक्तीचीं द्योतक आहेत. या पंडितवर्गाचा प्रतिनिधि 'केगी' (Kaegi) आहे. तो म्हणतो, "या सूक्तांपैकी बरीचशीं सूक्तें स्तुतिपर व प्रार्थनापर असून निरनिराळ्या देवतांस उद्देशून गायिलेलीं आहेत. या सूक्तांत चोहोंकडे अंतःकरणातील भक्तीचा उद्रेक झालेला दृष्टीस पडतो. हीं सूक्तें म्हणजे शुद्ध-
भावनेने दिलेले हविर्भाग प्रेमाने स्वीकारण्यासाठी देवतांची केलेली प्रा भक्षोत
होय. परमेश्वराच्या इच्छेने या कवींच्या अंतःकरणांत ज्या प्रेरणा झाल ध्यात्म
प्रेरणा अथवा त्या भावना या सूक्तांच्या द्वारे सुरस वाणीने व्यक्त कवित्वाचा
दाखविण्याचा या कवींचा उद्देश दिसतो." संहितेमध्ये कांही सामान्य चा उपयोग
सूक्तें आहेत हें केगीला मान्य आहे. परंतु त्याचें म्हणणें असें की तील काव्याला
बाल्यावस्थेतील निर्मल आणि जोरदार कविकल्पना या सूक्तांत त्यांच्या काव्याला
होतात. आपल्या वंशाच्या आध्यात्मिक उन्नतीच्या प्रथमावस्थ
आचार व विचार यांचें जें चित्र या वाङ्मयांत उत्तम रीतीने बंध आहे हें पाहूं.
त्याशी तादात्म्य करून घेण्याचें जो कोणी मनावर घे व जवळपास चाळीस
सूक्तांकडे निरनिराळ्या कारणांनी वेधिलें जाईल. age 19.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाल्यावस्थेंतील मुग्ध भाव पाहून कौतुक वाटेल, तर कित्येक ठिकाणीं त्याला नव्या जोमाची व सूक्ष्म दृष्टि पाहून त्याला आनंद होईल. तसेंच कोठे उठावदार शुद्ध चित्रें, तर कोठे कल्पनेच्या भराऱ्या पाहून मनाला आल्हाद वाटेल. '[६]

केगीच्या मताने ऋग्वेदांतील काव्य भक्तीच्या उद्रेकांतून निर्माण झालें आहे. आणि खरोखर सगळेंच उत्तम काव्य भक्तीच्या उद्रेकांतून उत्पन्न झालेलें असतें. ध्येय वस्तूशी तादात्म्य पावलेल्या कविमनांतून निघालेले ते सहजोद्गार असतात. श्रेष्ठ कवि, आत्मनिष्ठ तत्त्वज्ञ, आणि महान् भक्त यांच्यांत कांहीच फरक नसतो. प्रतिभा ही एका दृष्टीने भक्ताची 'परमप्रेमरूपा वृत्ति'च आहे, व दोघांचें साध्यहि एकच आहे. 'रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनाना पथजुषां नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णवइव ।'

ऋग्वेदांत कितपत काव्य आहे व त्या काव्याचें स्वरूप कसें आहे हे पाहावयास आपण प्रत्यक्ष ऋग्वेदाकडेच धाव घेतलेली बरी. वैदिक ऋषींनीच आपल्या कृतीविषयीं कांही सांगितलें आहे काय ? ऋग्वेदाचे भारतीय भाष्यकार त्याबद्दल काय म्हणतात ? खुद्द वैदिक वाङ्मयांत ऋग्वेदांतील साहित्याबद्दल काय सांगितलें आहे ? या सर्व गोष्टींचा विचार केल्यानेच आपल्याला ऋग्वेदांतील साहित्याविषयी कांही कळेल. तोच प्रयत्न आता करूं या.

ऋग्वेदसंहिता ही निरनिराळ्या अनेक सूक्तांचा संग्रह आहे. हीं सूक्तें जवळपास सातशें ऋषींनी लिहिलीं आहेत. त्यांत कांही अत्यंत प्राचीन तर कांही त्या मानाने अर्वाचीन आहेत. पूर्ण संहितेचे दहा भाग असून त्यांस मंडळें म्हणतात. साधारणतः असें म्हणतां येईल की संहितासुद्धा दोनवेळा झाली असावी. दोन ते सात हीं मंडळें प्रथम जमविलीं व नंतर त्या संहितेला एकीकडून पहिलें मंडळ व दुसरीकडून ८, ९ १० हीं मंडळें जोडण्यांत आलीं असावींत. याचा अर्थ असा नव्हे की २ ते ७ मंडळांतील सर्वच सूक्तें प्राचीन व इतर मंडळांतील सर्वच अर्वाचीन आहेत. दोन्ही प्रकारचीं सूक्तें सर्वच मंडळांत आहेत.

आ· शिवाय त्यांत 'आप्री सूक्तें' व 'वालखिल्य सूक्तें'हि घालण्यात आलीं.

वृद्धि
आणि ट्याच्या अशा रचनेची कल्पना आपल्या पूर्वजांस होती असें दिसतें.

——— ऋषयः शतर्चिनो मध्यमाः गृत्समदो विश्वामित्रो वामदेवोऽत्रिर्भरद्वाजा

३ गाथाः पावमान्याः क्षुद्र सूक्ताः महा सूक्ताः इति ' (अ. गृ. सू. ३-४).

sacrificia
sacrificial· पदपाटांत सहा ऋषींचा पदपाठ दिलेला नाही. तेव्हा पदपाठ

४ अं सहा ऋचा संहितेत दिलेल्या नव्हत्या. त्या मागाहून घालण्यांत

पाहा--"Ori आहे.
Journal, 194

५ सजो चा अर्थ करण्याचे जे अनेक प्रयत्न झाले त्यांत यास्काचा प्रयत्न

वनपस्ते शत ण ग्रंथांतूनहि ऋचांचा विचार केला आहे पण बहुंशी

ज्ञानकोशांतील आहे. (म. ज्ञा. को. भाग २ पान २८)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तो यज्ञविषयक आहे अर्थविषयक नव्हे. ब्रह्मार्णे रचली गेली त्या काळांतसुद्धा कांही ऋचा प्राचीन झाल्या होत्या याचीं गमकें दिसतात. यास्काचाहि अर्थविषयक असा पहिलाच प्रयत्न नव्हता. आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या अनेक नैरुक्तांचा उल्लेख तो करतो. यास्काच्या वेळीं याज्ञिक, ऐतिहासिक, नैदान आणि नैरुक्त असे वेदाभ्यासकांचे चार संप्रदाय होते. याज्ञिकांना वेदमंत्राच्या अर्थाची गरज नव्हती. त्यांची भिस्त वेदाक्षरावर असे. वेदार्थ करावा की नाही याबद्दल वाद घालणारा 'कुत्स' (निरुक्त अ. १ खंड १५) हा याज्ञिक दिसतो. नैरुक्तांचा हा सर्वांत मोठा प्रतिस्पर्धी असावा. नैरुक्त मंत्रांचे अर्थ करणारे तर याज्ञिक मंत्रांना अर्थहीन (अनर्थक) म्हणणारे. अर्थ करणाऱ्यांपैकी नैरुक्त हे व्युत्पत्ति व व्याकरणावर भर देत. ऐतिहासिकांच्या मतें सूक्तांतील देव हे पूर्वीचे मोठे पुरुष होऊन गेले व कवींनी त्यांना देवत्व आणलें. नैदानाची प्रवृत्ति वैदिक शब्दांचा अर्थ शाब्दिक व्युत्पत्तीवरून न करतां ज्या प्रसंगांवरून ते शब्द प्रचारांत आले त्यावरून ठरवावा अशी दिसते. याशिवाय आत्मविदांचाहि एक वर्ग असावा. त्यांच्या मतें ऋचांतून अध्यात्मिक तत्त्वाचें विवेचन केलेलें आहे.

यास्कासंबंधी आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. त्याच्या मते वैदिक सूक्तांतील वर्णनें रूपकात्मक आहेत. वृत्राबद्दल तो लिहितो—'आता वृत्र कोण? वृत्र म्हणजे मेघ असे नैरुक्त म्हणतात. त्वष्ट्याचा असुर पुत्र असे ऐतिहासिक म्हणतात. पाणी व वीज यांचें मिश्रण होऊन त्या मिश्रणक्रियेपासून वर्षाव होतो. या वस्तुस्थितीचें वर्णन रूपकानें केलें आहे.' (निरुक्त २.१६)

वरील विवेचनावरून कांही निष्कर्ष सुगमतेने काढता येतात. ऋग्वेदांतील सर्वच सूक्तें केवळ यज्ञाकरितां लिहिलीं असें विधान करणें हें केवळ धाडस होय. संहितीकरणाच्या इतिहासाशी मंत्र निष्पत्तीचा कांही संबंध नाही व त्या दोन क्रियांचे हेतुहि एक नाहीत. नैरुक्तांच्या मतानें सूक्तांतील वर्णनें हीं निसर्गावरील रूपकें होत, किंवा ऐतिहासिकांच्या मतानें पूर्वींच्या घटनांचीं माणसांना देव मानून केलेलीं वर्णनें होत. या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे ऋग्वेदाकडे साहित्य दृष्टीनें पाहाण्यास आधार मिळतो. ऋग्वेदांतील वर्णनें ही रूपकें असोत की ऐतिहासिक पोवाडे असोत किंवा आत्मवाद्यांच्या मताप्रमाणे त्यांत अध्यात्म आलेलें असो, कोणताहि प्रकार घेतला तरी तो वैदिक ऋषींच्या कवित्वाचा निःसंदिग्ध पुरावा आहे. एकदा अशीं काव्यें निर्माण झाल्यावर त्यांचा उपयोग यज्ञाकरिता केला काय किंवा इतर कशाकरिता केला काय त्यांतील काव्याला बाध येत नाही. वैदिक ऋषि स्तुतिपाठक तर नाहीतच पण त्यांच्या काव्याला गौणत्वहि नाही. ते मुख्यतः आणि पूर्णांशानें कवि आहेत.

आता या सूक्तांचा यज्ञप्रक्रियेशी तरी खरोखर कितीसा संबंध आहे हें पाहूं. इंद्र, अग्नि आणि सोम यांचीं सूक्तें, तसेंच कांही मांत्रिक व जवळपास चाळीस

---

७ P. S. Shastry: Studies in Rigveda, Page 19.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यज्ञिय सूक्तें मिळून ५८० सूक्तें होतात. यांचा उपयोग या ना त्या प्रकारे यज्ञांत केला जातो. सृष्टयुत्पत्ति, आख्यायिका-इतिहास याबद्दलचीं सुमारे १०० सूक्तें, तशींच दानस्तुतींचीं चाळीस सूक्तें यांचा यज्ञाशीं कांहीं संबंध नाही. सायणाने अनुक्रमणीच्या आधारे सुमारे ७०० सूक्तांचे विनियोग दिले आहेत. त्यांत जवळजवळ दोनशे सूक्तांच्या बाबतींत 'सामान्यो विनियोगः', 'गतो विनियोगः', किंवा 'लैङ्गिको विनियोगः' अशा विधानें केलीं आहेत. याचा अर्थ इतकाच की या सूक्तांना मूळचा याज्ञिक विनियोग नसून तो त्यांच्यावर लादला आहे. अशा प्रकारे जवळपास ३५० सूक्तें यज्ञीय विनियोगापासून अलिप्त आहेत. आता हीं जीं इंद्र, सोम आणि अग्नि यांचीं सूक्तें आहेत त्यांतील बऱ्याचशा सूक्तांची रचना पोवाडे, भक्तिस्तोत्रें किंवा सांधिक गाणीं या स्वरूपाचीं आहेत. एकंदर संहितेंतील निम्यापेक्षा अधिक सूक्तें याज्ञिक विनियोगाकरितां रचलीं नाहीत असें सहजासहजी दिसून येते.

बरें, मंत्रांच्या अर्थाचा विनियोगाशी अनेक वेळा मुळीच मेळ बसत नाहीं. 'अनर्थका हि मंत्राः' अशा प्रकारचा याज्ञिकांनी आपला ग्रह करून घेतल्यावर मग हा मेळ बसणार कसा ? मंत्रांचा अर्थ, मंत्राची देवता, आणि त्या मंत्राने यज्ञांत करावयाचें कार्य याचा अर्थाअर्थी कांही संबंध दिसून येईलच असें सांगता येत नाही. हें दाखविण्यास पुढील उदाहरणें पुरे होतील.

(१) ग्रह मखामध्ये केतूचें आवाहन करतांना पुढील मंत्र म्हणतात—

केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्या अपेशसे ।
समुषद्भिरजायथाः ॥

(हे मनुष्यांनो, अंधाराच्या ठायीं उजेड, व अरूपाचें ठायीं रूप उत्पन्न करीत, हा (सूर्य) उषांबरोबर जन्माला येत आहे.) येथे या मंत्रांतील 'केतु' हा शब्द आणि 'केतु' हें ग्रहाचें नांव याच्या उच्चारसादृश्यापलीकडे मंत्र आणि देवतेचा संबंध नाही.

(२) श्रा[illegible]नावाच्या वनस्पतीचा आपण उपयोग करतों त्यावेळी ६-४८-१७ हा मंत्र म्हणतात. त्या मंत्राची सुरुवात 'मा काकंबीर मुद् वृहो—' अशी आहे. त्या मंत्राचा अर्थ आणि माका वनस्पति यांचा कांहीहि संबंध नाही. मंत्रामध्ये पूषन् देवतेला उद्देशून 'तूं आमच्या शत्रूंचा नाश कर' अशी प्रार्थना आहे. मागील उदाहरणांत शब्दसादृश्य तरी आहे. येथे तेंहि नाहीं. 'मा' हें एक पद व दुसऱ्या पदातील पहिलें अक्षर 'का' यांवरून विनियोगाचें लिंग घेतलें आहे.

(३) आपण रोज देवपूजा करितों तेव्हा देवाला दह्याचें स्नान घालताना 'दधिक्राव्णो अकारिषम्' हा मंत्र म्हणतों. या मंत्रांत 'दधिक्रावन्' नांवाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रसिद्ध घोड्याचें वर्णन आहे. 'दधि' या दोन अक्षरांवरून हा विनियोग बसविला, दुसरें काय ?

शेकडों मंत्रांविषयीं असाच प्रकार दाखवून देतां येईल. ऋषींनी हीं सूक्तें यज्ञाकरितां किंवा इतर धार्मिक विधींत उपयोजिण्याकरितां जर केलीं असतीं तर असा प्रकार दिसला नसता.

हें झालें विनियोगाचें प्रकरण, सूक्त देवतांची तर याहून निराळीच मौज आहे. कित्येक सूक्तांच्या देवतांत विकल्प आहे आणि आख्यान सूक्तांची तर मौजच झाली आहे. उदाहरणार्थ पुरुरवा-उर्वशीचें सूक्त (१०–९५) घेऊं. यांत पुरुरवा आणि उर्वशी यांचा संवाद आहे. आता या मंत्रांचा ऋषि कोण ? आणि देवता कोणती ? इंद्रादिकांच्या सूक्तांत जो बोलतो तो ऋषि आणि जिला उद्देशून बोलतो ती देवता हा नियम ठीक आहे. पण या पुरुरव्याच्या सूक्तांत काय करावयाचें ? तेव्हा तोच—'यस्य वाक्यं स ऋषिः, या तेन उच्यते सा देवता'—हा नियम येथेंहि लावून टाकला. तेव्हा मौज अशी झाली की सूक्तांत जेव्हा पुरुरव्याचें भाषण येतें तेव्हा पुरुरवा ऋषि आणि उर्वशी देवता, आणि उर्वशी उत्तर देते तेव्हा उर्वशी ऋषि आणि पुरुरवा देवता, असें आलटून पालटून तीं दोघें ऋषि व देवता बनतात. सर्वच संवादसूक्तांच्या बाबतींत असेंच झालें आहे. वस्तुस्थिति अशी दिसते की हीं सुंदर संवादसूक्तें अज्ञात ऋषींनी लिहिलीं व त्यांत त्यांनी उत्तम तऱ्हें गोवून ठेवलीं[८]. पण याज्ञिकांना त्यांना त्यांतील साहित्याशी, तत्त्वांशी किंवा अर्थाशी कांहीच करावयाचें नव्हतें. त्यांनी आपला सामान्य नियम लावून काम उरकून घेतलें. अशी सुंदर काव्यें निर्माण करणाऱ्या त्या अज्ञात पूर्वजांना ही काय कल्पना की आपल्या ज्ञानाचे वारस आपल्या नाट्यगीतांचें असें नाटक करतील म्हणून !

ऋग्वेदांतील सूक्तें छंदोबद्ध आहेत. ऋषींना छंदांचें किती महत्त्व वाटत होतें हें त्यां संबंधीच्या अनेक उल्लेखांवरून दिसतें. पण संहिताकारांनी संग्रह करताना छंदांकडे लक्ष पुरविलेलें दिसत नाही. त्यांनी शक्य तेथे संधि केले व त्यामुळे कित्येक ठिकाणीं छंदाचें अक्षरें कमीं पडलीं. याचीं शेकडों उदाहरणें आहेत. येथे केवळ एकच देतों—ऋग्वेदाच्या अगदी पहिल्याच सूक्तांत अशी ऋचा आहे—

अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ।
स देवाँ एह वक्ष्यति ॥ (१-१-२)

यातील छंद त्रिपदा गायत्री आहे. यातील प्रत्येक चरणांत आठ अक्षरें पाहिजेत. पण वरील ऋचेंत दुसऱ्या चरणांत सातच अक्षरें दिसून येतील. मूळांतील चरण असा असावा—"ईडिओ नूतनैरुत"

८ कांही संवादसूक्तांचें काव्य दृष्टीने मीं "अभिरुची"तून विवेचन केलें होतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऋग्वेदाचा अभ्यास करताना आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ती म्हणजे हल्लींची ऋग्वेद संहिता म्हणजे कांहीं संपूर्ण सूक्तवाङ्मय नव्हे. संहिता-काराला त्यावेळीं जितकीं सूक्तें एकत्र करतां आलीं तितकीं त्यांनी एकत्र केलीं. याशिवाय किती तरी सूक्तें कालोदरांत गडप झालीं असावींत. प्रथम मंडळांतील १९ वें सूक्त एकाच ऋचेचें आहे. त्यानंतरचीं हजार सूक्तें गडप झालीं असा समज आहे. युगारंभीं वेदाचा उद्धार करीत असतां वेदाचा कांहीं भाग लुप्त झाला असें पुराणें सांगतात. हल्लींच्या संहितेंत सुद्धा कांहीं सूक्तें अशीं दिसतात कीं त्यांतील ऋचा केवळ एकत्र करून ठेवल्या असाव्यात. परंपरेने चालत आलेलीं सूक्तखंडें एकत्र करून हीं सूक्तें संहिताकारांनी बनविलीं. पहिल्या मंडळातील १६४ वें सूक्त अशाप्रकारचें दिसतें.

ऋग्वेद सूक्तें रचणारे ऋषि आणि या सूक्तांची संहिता बनविणारे संहिता-कार यांच्यात केवढा तफावत आहे हें यावरून दिसेल. याज्ञिकांचा आणि सूक्तकारांचा तर कांहीच संबंध नाहीं. ऋग्वेद सूक्तें व यज्ञविधान यांत हेतु-हेतुमद्भाव नाहीं. तेव्हा सूक्तें यज्ञाच्या अनुषंगाने लिहिलीं आहेत ही कल्पना मनातून काढून टाकली पाहिजे व त्यांचा स्वतंत्र रीत्या अभ्यास केला पाहिजे म्हणजेच त्यांतील साहित्य कळेल.

—२—

साहित्य म्हणून ऋग्वेदाचा अभ्यास करावयाचा विचार केला की वेदाच्या अपौरुषेयत्वाची समजूत आड येते. वेदाच्या अपौरुषेयत्वाबद्दल अनेकांनी अनेक प्रकारें लिहिलें आहे. त्या वादांत येथे पडावयाचें नाहीं. अपौरुषेयत्वाचा प्रश्न बाजूला ठेवूनहि असें म्हणता येतें की वैदिक सूक्तांतून जुने कवि व नवे कवि, तसेंच जुनी सूक्तें व नवीं सूक्तें यांचा निर्देश सापडतो.

[अ] जुन्या व नव्या कर्त्यांच्या उल्लेखाची कांहीं उदाहरणें—

(१) अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत । (१-१-२)

—अग्नि हा पूर्वीच्या ऋषींनी, तसाच नवीन ऋषींनीहि स्तविण्यास योग्य आहे.

(२) ये च पूर्वे ऋषयो ये च नूत्नाः
इन्द्र ब्रह्माणि जनयन्त विप्राः (७-२२-९)

—जे पूर्वी ऋषि होऊन गेले आणि जे नवीन आहेत त्यांनीं, हे इंद्रा, तुझीं स्तोत्रें रचलीं आहेत.

(३) प्र द्यावा यज्ञैः पृथिवी नमोभिः
स बाध ईळे बृहती यजत्रे ।
ते चिद्धि पूर्वे कवयो गृणन्तः
पुरो मही दधिरे देव-पुत्रे ॥ (७-५३-१)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—पूज्य व विस्तृत अशा द्यावा पृथिवीचे यज्ञ व स्तोत्र यांनी आम्ही बरोबरीच्या लोकांसहित यजन करितों. थोर आणि देवांना प्रभाविणारी द्यावा पृथिवी पूर्वीचे कवि स्तुति करण्याकरिता अग्रभागीं ठेवीत असत.

(ब) जुन्या व नवीन गीतांचे कांही उल्लेख—

(१) त्वां स्तोमा अवीवृधन् त्वामुक्था शतक्रतो ।
त्वां वर्धन्तु नो गिरः ॥ (१-५-८)

—हे बहुप्रज्ञ इंद्रा, तुला स्तोमांनी व स्तुतींनी वाढविलें. तर आमची वाणीहि तुला वाढवो.

(२) नव्यं नु स्तोममग्नये दिवःश्येनाय जीजनम् ।
वस्वः कुविद्वनाति नः ॥ (७-१५-४)

—स्वर्गाकडे ससाण्याप्रमाणे वेगाने जाणाऱ्या अग्नीकरिता मी नवीन स्तोत्र केलें आहे. तो आम्हाला विपुल धन देवो.

(३) ये पूर्वजे पितरा नव्यसीभिः
गीर्भिः कृणुध्वं सदने ऋतस्य ॥ (७-५३-२)

—हे स्तोतेहो, या यज्ञसदनांत तुम्ही नवीन स्तोत्रांनी जगाचे प्राचीन पितर जे द्यावा पृथिवी त्यांना आणा.

(४) प्र वां मन्मानि ऋचसे नवानि
कृतानि ब्रम्ह जुजुषन्निमानि ॥ (७-६१-६)

—हे मित्रावरुणहो, तुमच्या सेवेकरिता नवीन माननीय स्तोत्रें रचिलीं आहेत. हीं स्तवनें तुम्हाला प्रसन्न करोत.

(५) शुचिं नु स्तोमं नवजातमद्य
इन्द्राग्नी वृत्रहणा जुषेथाम् ॥ (७-९३-१)

—हे वृत्रहंते इंद्राग्नीनो, आज नवीन केलेल्या या पवित्र स्तोत्राचा तुम्ही स्वीकार करा.

नवे कवि व जुने कवि, तसेच नवीं स्तोत्रें व जुनीं स्तोत्रें याबद्दलचे शेकडो निर्देश ऋग्वेदांत आहेत. पूर्वीच्या स्तोत्रांइतकींच परिणामकारी, देवाला प्रसन्न करणारीं स्तोत्रें आपलीहि असावींत अशी त्यांची इच्छा असे. चांगलें गीत आपल्या हातून झालें म्हणजे त्यांना आनंद होत असे. ऋग्वेद सूक्तें ही मानवी कृति आहे; आणि मानवी हृदयांतूनच तिची निर्मिति आहे. आपण जर त्या कवींशी हृदयसंवाद करूं शकलों तर तिचा आस्वाद आपणासहि घेतां येईल.

वैदिक सूक्तांचा काल—मग तो कितीहि शतकांवर पसरलेला असो—काव्य निर्मितीचा काळ होता. यशाची ती प्रभात होती. नव युगाची ती सुरुवात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होती. प्रगति, उत्साह, आणि सर्वतोमुख पुरोगामिता हें त्या युगाचें लक्षण होतें. आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रांत नवीन प्रयोग करावेत, त्या प्रयोगांच्या यशाने अधिक जोम वाढावा, रोज एक पाऊल पुढें टाकावें या वृत्तीने सूक्तकारांचें विश्व व्यापून टाकलें होतें. हीच वृत्ति त्यांच्या काव्यांतहि दिसून येत होती. पुढील कांही उदाहरणें पाहा. त्यांत तुम्हाला किती तरी वेगवेगळ्या गोष्टी दिसतील—

(अ)

स नः स्तवान आभर गायत्रेण नवीयसा (१-१२-११)

—हे अग्ने, गायत्री छेदांत अगदी नवीन स्तोत्र रचून तुझी स्तुति करीत आहोंत.

अयं देवाय जन्मने स्तोमो विप्रेभिरासया ।
अकारि रत्न धातमः ॥ (१-२०-१)

—रत्नासारखें उज्वल असें हें स्तोत्र ऋभूंना देवपद प्राप्त होण्याच्या वेळीं अगदी जागच्याजागीं केलें आहे.

वैदिक ऋषि नवीन नवीन स्तोत्रें करीत, एवढेंच नव्हे तर कित्येक शीघ्र कवि असत ते जेथल्या तेथे अगदी वेळेवर नवीन आणि चांगलें काव्य करीत, व त्याबद्दल त्यांना अभिमान वाटे.

(आ)

इन्द्रमिद् गाथिनो बृहत्, इन्द्रमर्केभिरर्किणः ।
इंद्रं वाणीरनूषत ॥ (१-७-१)

—गाथा म्हणणारे काय, किंवा अर्कपाठक काय, किंवा इतर प्रकारे गाणारे (वाणीः) काय,—सर्व इंद्राचीच स्तुति करितात.

ता यज्ञेषु प्रशंसत, इन्द्राग्नी शुंभतांनरः ।
ता गायत्रेषु गायत ॥ (१-२१-२)

—लोकहो, इंद्राग्नीची प्रशंसा करा; त्यांची कीर्ति वाढवा, आणि गायत्रांनी त्यांचें गायन करा.

गायन्ति त्वा गायत्रिणोऽर्चन्त्यर्कमर्किणः ।
ब्रम्हाणस्त्वा शतक्रत उद्वंश इव येमिरे ॥ (१-१०-१)

—गायत्रे तुझें गायन करितात; अर्कपाठक तुझे पोवाडे गातात; आणि ब्रह्म-पाठक तुझी कीर्ति वेळू प्रमाणे उंचावतात.

वैदिक ऋषींच्या काव्यांचे वेगवेगळे प्रकार होते. त्यांच्या गायकांचेहि वेगवेगळे प्रकार असत. गाथिनः; अर्किणः; गायत्रिणः; ब्रह्मे, वाणीः (कदाचित हे फडाने गाणारे असतील) असे निरनिराळे गायक असत व त्यांच्या त्या त्या गाण्यांनाहि गायत्र, अर्क, ब्रह्म इत्यादि नांवे होतीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(५)

अच्छा वदतना गिरा जराजै ब्रह्मणस्पतिम् ।
अग्निं मित्रं च दर्शतम् ॥
मिमीहि श्लोक मास्ये पर्जन्य इव ततनः ।
गाय गायत्र मुक्थ्यम् ॥ [१–३८–१३, १४.]

—ब्रह्मणस्पति, अग्नि आणि दर्शनीय मित्र यांना स्तविण्यासाठी तुम्ही अस्खलित वाणीने गा. मुखांत श्लोकाची रचना करून पाऊस गर्जना करितो त्याप्रमाणे गायत्रांत गा.

प्रप्र वस्त्रिष्टुभमिषं मन्दद्वीरायेन्दवे । (८–६९–१)

—वीरांना आनंद देणाऱ्या इंद्राला त्रिष्टुभ् छंदातील स्तोत्र म्हणा.

अथ स्वराति गर्गरो गोधा परि सनिष्णवत् ।
पिङ्गा परि चनिष्कदत् इंद्राय ब्रह्म उद्यतम् ॥ [८–६९–९]

—कर्णा [गर्गर] वाजूं लागला; हातांनी वाजवावयाची वाद्यें वाजूं लागलीं; धनुष्याचे टणत्कार बाहेर पडूं लागले; आता इंद्राचें स्तवन सुरू होऊं द्या.

काव्य गायक आपली गाणी अस्खलित वाणीने गात. गायत्र म्हणणाऱ्याच्या वाणीचा प्रवाह पावसासारखा धो धो बाहेर पडत असे. इंद्राचे पोवाडे त्रिष्टुभांत असत, (आणि इंद्राचीं सुंदर स्तोत्रें त्रिष्टुभांतच आहेत.) रणावेश उत्पन्न करण्याकरिता असे पोवाडे म्हटले जात.

(६)

प्रियमेधावदत्रिवज्जातवेदो विरूपवत् ।
अङ्गिरस्वन्महिव्रत प्रस्कण्वस्य श्रुधीहवम् ॥
महिकेरव उतये प्रियमेधा अहूषत । (१-४५-३, ४ अ)

—हे महाव्रता अग्ने, प्रियमेधा, अत्रि, विरूप, अंगिरस् यांच्याप्रमाणेच तूं प्रस्कण्वाचीहि हाक ऐक. स्तोत्रें रचण्यांत पटाईत (महाकर्मकरी) प्रियमेधा तुला संरक्षणाकरिता बोलाविता झाला.

एता ते अग्ने जनिमा सनानि ।
प्र पूर्व्याय नूतनानि वोचम् ॥ (३-१-२०)

—हे अग्ने, तुझ्या जन्मासंबंधीचीं जुनीं व नवीं गीतें मी म्हणत आहें.

एवा नपातो मम तस्य धीभिः ।
भरद्वाजा अभ्यर्चन्त्यर्कैः ॥ (६-५०-१५)

—अशाप्रकारे त्या माझे नातु भरद्वाज स्तोत्रें गाऊन तुमची स्तुति करितात.

अहं प्रत्नेन मन्मना गिरः शुंभामि कण्ववत् ।
येनेन्द्रः शुष्ममिद्दधे ॥ (८-६-११)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—ज्यामुळे इंद्राला सामर्थ्य येतें अशा त्या प्राचीन मननीय स्तोत्राने मी माझी वाणी विभूषित करतों.

> इमां सुपूर्व्यां धियं मधोर्घृतस्य पिप्युषीम् ।
> कण्वा उक्थेन वावृधुः ॥ (८-६-४३)

—ज्यातून मधाप्रमाणे किंवा घृताप्रमाणे गोडप्रवाह वाहात आहे अशाप्रकारच्या या प्राचीन स्तोत्राला कण्व वाढविते झाले.

> तमूषु समना गिरा पितॄणां च मन्मभिः ।
> नाभाकस्य प्रशस्तिभिः ॥ (८-४१-२)

—त्या वरुणाची स्तुति त्याला योग्य अशा वाणीने, पितरांचीं स्तोत्रें आणि नाभाकांचीं (माझीं) स्तोत्रें यांनी करतों.

> मनो न्वा हुवामहे नाराशंसेन सोमेन ।
> पितॄणां च मन्माभिः ॥ (१०-५७-३)

—नाराशंस (पितरांनी तयार केलेल्या) सोमाने, आणि पितरांनी तयार केलेल्या स्तोत्रांनी आम्ही (सुबंधूचें) मन आम्हाकडे वळवितों.

सूक्तकारांच्या समोर जुन्या कवींचे आदर्श होते. प्रियमेधा, अत्रि, विरूप, अंगिरस इत्यादि जुन्या कवींनी ज्याप्रमाणे अग्नीला आळविले त्या प्रमाणेच प्रस्कण्व आळवूं पाहतो. प्रियमेधा हा स्तोत्रें रचण्यांत फार पटाईत होता हें प्रस्कण्वाला माहीत होतें. विश्वामित्र कुलातील ऋषि (३ रें मंडळ) पहिल्याच सूक्तांत जुन्या आणि नव्या स्तोत्रांनी आळवितो. माझें नातु अशी अशी स्तुति करितात असे भरद्वाज सांगतो. कदाचित नातवांनी नवीन रचना करून आजोबाला दाखविली असेल आणि आजोबाने ती दुरुस्त करून देताना शाबासकी दिली असेल. कण्व मंडळांतील सहावें सूक्त विचार करण्यासारखें आहे. कण्वाने जुनें स्तोत्र घेतलें आणि तें गोड सूक्त आपल्या वाणीने वाढविलें. नाभाकऋषि वरुणाला पितरांच्या आणि आपल्या स्तोत्रांनी सारखाच आळवितो आणि दहाव्या मंडळांतील बंधु, श्रुतबंधु, आणि विप्रबंधु हे कवि आपल्या पूर्वजांचीं गीतें म्हणून सुबंधु नांवाच्या आपल्या मृत बंधूला जिवंत करावयास पाहतात.

प्रथम मंडळांतील १०५ वें सूक्त आंगिरस कुलाचें आहे. शाटयायन ब्राह्मणांत या सूक्तासंबंधी अशी आख्यायिका दिली आहे. एकत, द्वित आणि त्रित असे तीन ऋषि होते. ते अरण्यांतून जात असता तहानेने व्याकूळ झाले. तेव्हा त्रित पाणी पिण्याकरिता एका विहिरींत उतरला. तो स्वतः पाणी प्याला व इतरांनाहि त्याने पाणी दिलें. बाकीचे दोघे पाणी प्याले. पाणी पिऊन झाल्यावर त्यांनी त्रिताला विहिरींत ढकलून दिलें. व त्याचें धन लुबाडून, आणि विहिरीचें तोंड एका चाकाने बंद करून चालते झाले. तेव्हा त्रिताने विहिरीच्या बाहेर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पडण्याकरिता जी प्रार्थना केली तें हें सूक्त आहे. अनुक्रमणीमध्ये कुत्स किंवा त्रित आप्त्य अशी दोघांचीहि या सूक्ताचे ऋषि म्हणून नांवें दिली आहेत. अशा कांहीं सूक्तांचा विचार करतां असें वाटतें की कित्येकदा ऋषींनीं जुनी सूक्तें घेऊन तीं नवीन बनविलीं असावींत. कित्येकदा जुन्या सूक्तांना आपली पुरवणी जोडून, तर कित्येकदा जुन्या सूक्तांतील विचार नवीन भाषेंत मांडून, तर कित्येकदा जुनींच सूक्तें ठाकठीक करून त्यांनी तींच पुन: प्रवर्तित केलीं असतील.

(उ)

पूर्वीच्या नांवाजलेल्या कवींप्रमाणेच आपलीहि रचना परिणामकारक आणि कीर्तिप्रद असली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे. आपलीं सूक्तें लोकांसमोर जातांना तीं चांगल्या स्वरूपांत गेलीं पाहिजेत; तीं चांगली गातां आलीं पाहिजेत; लोकांना तीं आकर्षक वाटलीं पाहिजेत; ती निर्दोष असलीं पाहिजेत या गोष्टींबद्दल त्यांचा प्रयत्न असे. वैदिक ऋषि आपलीं सूक्तें नीट शोधून शोधून रचित असत. याबद्दल ऋग्वेदांत अनेक निर्देश आहेत. अशी निर्दोष रचना जगाला व देवाला आवडलीच पाहिजे असा त्यांचा आत्मविश्वास असे.

इमं स्वस्मै हृद आ सुतष्टम्
मन्त्रं वोचेम कुविदस्य वेदत् । [२-३५-२]

—हा आम्ही अंतःकरणापासून तयार केलेला मंत्र चांगल्या तऱ्हेने म्हणूं तो त्याला अनेकदा ध्यानांत येवो.

एते द्युम्नेभिर्विश्वमातिरन्त
मन्त्रं ये वारं नर्या अतक्षन् । (७-७-६)

—जे उत्तम प्रकारे मंत्र करूं शकतात, ते जगाला प्रकाशाने परिपूर्ण करतात.

अहं तष्टेव बन्धुरं पर्यचामि हृदा मतिम् । (१०-११९-५)

—सुतार ज्याप्रमाणे सुंदर रथ मनापासून तयार करतो त्याप्रमाणे मी हें सुंदर स्तोत्र मनापासून तयार करीत आहें. अशा प्रकारचीं वचने अनेकदा आलीं आहेत. आपलें काव्य निर्दोष असावें यावर त्यांचा कटाक्ष असे. ही कल्पना मांडताना ते अनेकदा तक्ष् = घासून घासून साफ करणें, आकाराला आणणें हा किंवा या अर्थाचा एखादा शब्द वापरीत हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

(ऊ)

ऋग्वेदीय कवि सूक्तें तयार करीत, त्यांचें शोधन करून तीं निर्दोष करीत आणि गाऊन दाखवीत. या कवींच्या सभा असत. तेथे त्यांचे कार्यक्रम होत असत. चर्चा होत असे. काव्य गायनाच्या स्पर्धा होत असत. अशा एका सभेमध्ये एका

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवींचा कांव्य गायनाचा कार्यक्रम ठरला होता. बराचसा श्रोतृगण अगोदरच सभास्थानी येऊन बसला होता. ठरलेल्या वेळेवर कवि आला त्याच्याहि बरोबर त्याची कांही मित्र मंडळी होती. तो सभास्थानी आल्यावर त्याला त्याच्या जागेवर नेलें आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली—

"नमः सखिभ्यः पूर्वसद्‌भ्यो नमःसाकं निषेभ्यः ।
युञ्जे वाचं शतपदीम् ॥
युञ्जे वाचं शतपदीम् गाये सहस्रवर्तनि ।
गायत्रं त्रैष्टुभं जगत् ॥
गायत्रं त्रैष्टुभं जगत् विश्वा रूपाणि संभृता ।
देवा ओकांसि चक्रिरे ॥ (सामवेद २-२१-७)

—येथे पूर्वीच येऊन बसलेल्या आणि माझ्याबरोबर आता आलेल्या मित्रांना माझा नमस्कार असो. मी आता आपल्याला काव्य गावून दाखवितो. या काव्यांत आपणाला शेकडों प्रकारचीं पदें, हजारों पद्यप्रकार, दिसून येतील. गायत्र त्रैष्टुभ् आणि जगतीचीं जेवढीं म्हणून रूपें आहेत तीं सर्व आपणाला येथे दिसतील आणि प्रत्यक्ष देवानी त्यांत वास्तव्य केले असें आपणाला वाटेल.

ऋग्वेदीय कवींचा कविव्यापार केवढा मोठा व कशा प्रकारचा होता याची थोडीशी कल्पना वाचकांना यावरून येईल. त्यांचे काव्यविषय मुद्धा अनेक होते. त्यांच्यांत भक्तिमय अंतःकरणाची आर्तता होती, तत्वविचारांची उच्चता होती, आणि जीवनाकडे सुखमय वृत्तीने पाहून त्या संबंधी ते लिहीत होते. विवाह, ज्ञान, किंवा दान सूक्तांसारखीं गंभीर सूक्तें, नासदीक, पुरुष इत्यादि तात्विक सूक्तें, अक्षदेवना सारखीं करुणरम्य सूक्तें, मंडूकांसारखा विनोद—मानवी स्वभावांतील सर्व प्रकार या सूक्तातून प्रतीत झालेले दिसतील. या सर्वांबद्दल येथें विवेचन करणें शक्य नाही. ऋषींचा आत्मप्रत्यय आणि त्यांच्या प्रतिभेची उच्चता यांबद्दल थोडेंसें सांगून हें प्रकरण संपवूं.

—३—

ऋग्वेदीय सूक्तांना साहित्य हा शब्द लावताना, त्या सूक्तांत आत्मप्रत्यय आणि प्रतिभेचा विलास दिसून येतो हें दाखविण्याची जबाबदारी येऊन पडते. या गोष्टी जर ऋग्वेदीय सूक्तांत दिसल्या नाहीत तर मग साहित्यदृष्टीने त्याचा अभ्यास करण्याचीहि जरूर नाही. ऋग्वेदांत त्याच त्याच देवतांचीं वर्णनें आहेत. अनेक देवतांचे वर्णन त्याच त्याच शब्दांत केलेलें आहे. हीं सूक्तें यज्ञप्रसंगी मानाचे पाहुणे म्हणून आलेल्या देवांना खुष करण्याकरितांच जर गायिलीं असतील तर मग हीं देवतांचीं सूक्तें आणि कोणत्याहि सभा समारंभाच्यावेळी "उत्सवमूर्तींच्या" स्वागतार्थ आज गायिलीं जाणारीं स्वागतगीतें यांच्यांत फरक तो काय राहिला ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोष्ट खरी आहे. ऋग्वेदांतहि अशीं स्वागतगीतें, स्तुतिगीतें आहेत. पण ऋग्वेद म्हणजे तेवढींच गीतें नाही. ऋग्वेदांत इतरहि काव्यविषय आहेत आणि ते भरपूर आहेत. त्यांत ऋग्वेदीय कवींचा आत्मप्रत्यय व प्रतिभा विलास आपणास दिसतो. ऋग्वेदांतील सर्वच सूक्तें एका प्रतीचीं आहेत असें कोणीहि म्हणत नाही. कमी अधिक प्रकारचीं सूक्तें ऋग्वेदांतहि आहेत. ऋग्वेद हा अनेक ऋषींच्या सूक्तांचा एक संग्रह आहे. एककर्तृक ग्रंथांतसुद्धा प्रतिभेचा विलास सर्वत्र सारखाच दिसत नसतो. मग संग्रहात्मक ग्रंथांत तो कोठून दिसणार ? तरीहि ऋग्वेदाचा बराच मोठा भाग अक्षर वाङमयांत गणला जाईल असें खात्रीपूर्वक म्हणतां येतें.

वैदिक सूक्तें हीं केवळ प्रासंगिक गीतें नाहीत याचे पुरावे मागे दिलेले आहेत, पण तेवढ्यावरून त्यांत आत्मप्रत्यय आणि प्रतिभाविलास आहेच असें म्हणतां येणार नाही. त्यांची निश्चित गमकें त्यांच्या सूक्तांतून दिसतात हें दाखवावें लागतें. तोच प्रयत्न आतां करूं.

आत्मप्रत्यय आणि प्रतिभा यांचा अन्योन्य संबंध आहे. आत्मप्रत्ययाचा कलात्मक आविष्कार म्हणजे प्रतिभेचा विलास. आणि कविप्रज्ञेची अपूर्व अशी वस्तुनिष्ठा म्हणजे आत्म प्रत्यय. आत्मप्रत्ययाशिवाय प्रतिभेचें स्फुरण होत नाही. आणि प्रतिभेचें स्फुरण म्हणजेच आत्मप्रत्ययाची अभिव्यक्ति. म्हणूनच अभिनवगुप्ताने प्रतिभेचें लक्षण दोन प्रकारें सांगितलें आहे.—" अपूर्व निर्माण क्षमा प्रज्ञा " आणि " अपूर्व वस्तु निष्ठा प्रज्ञा " असें तें द्विविध लक्षण होय. हीं दोन लक्षणें स्वतंत्र वेगवेगळीं घेऊन काम चालत नाही. दोन्ही लक्षणें एकत्र घेऊन आपणाला जो प्रज्ञाविषयक बोध होतो तें प्रतिभेचें स्वरूप होय.

प्रतिभावान् कवि क्रांतदर्शी असतो. एका विशिष्ट मनोऽवस्थेंत तो संक्रांत झालेला असतो. या अवस्थेचें वर्णन साहित्यशास्त्रांत 'विगलित वेद्यांतरत्व' वगैरे शब्दांनी केलें आहे. या अवस्थेत त्याचा प्रत्यय शब्दांच्या रूपाने बाहेर पडत असतो. त्या अवस्थेंत कवि काव्य करीत असतो असें म्हणण्यापेक्षा, त्याच्या अनुभवाचें जें व्यक्तीकरण होत असतें त्याला आपण काव्य ही संज्ञा देतों हें म्हणणें योग्य होईल. कवीचें काव्य वस्तूशीं 'तन्मयीभवन' म्हणजे आत्मप्रत्यय होय. या तन्मयीभवनाशिवाय महाकवींचें काव्यच बाहेर पडत नाही — ' यावत् पूर्णो न चैतेन तावन्नैव वमत्ययम् ' असें हृदयदर्पणकार म्हणतात. या अवस्थेंत कवीला शब्दांसाठी अडून बसावें लागत नाही. शब्द त्याच्यासमोर दासासारखे हात जोडून उभे असतात. कवीच्या या अभावितपणे चाललेल्या कवि व्यापाराचें वर्णन ' अलंकारांतराणि निरूप्यमाण दुर्घटान्यपि रसभाव समाहित चेतसः प्रतिभानवतः कवेः अहंपूर्विकया परापतन्ति ' असें आनंदवर्धनाने केलें आहे. कवीचा हा व्यापार इतका अभावित असतो की कवि लौकिक मनोभूमिकेंत

 उतरल्यावर आपल्या तोंडून काव्य कसें बाहेर पडलें हें त्याचें त्यालाच कळत

नाही. वाल्मीकीच्या तोंडून " मा निषाद– " हा श्लोक बाहेर पडल्यावर तो भानावर आला तेव्हा त्याची स्थिति मोठी विलक्षण झाली. 'शोकेनार्तस्य शकुनेः किमिदं व्याहृतं मया' ? त्याचें त्यालाच कळेना. तो आश्रमांत आला. सर्व व्यवहार करीत होता. शिष्यांशी इतर गोष्टी करीत होता. पण सकाळच्या अनुभवाचा विस्मय त्याच्या मनांतून जाईना – ' उपविष्टः कथाश्चान्याश्चकार ध्यानमास्थितः' –ब्रह्मा आला, त्याचें त्याने स्वागत केलें पण तें सुद्धा विमनस्क स्थितींतच. ब्रह्मदेवाने तें सर्व ओळखलें आणि स्मितमुखाने वाल्मीकीला सांगितलें – 'मच्छन्दादेव ते ब्रह्मन् प्रवृत्तेयं सरस्वती'–तूं रामकथा लिही. तुझ्या प्रतिभाबळाने तुला रामचरितांतील 'रहस्यंच प्रकाशंच' सर्व ज्ञात होईल. ब्रह्मदेव तेथेच अंतर्धान पावले; वाल्मीकि अधिकच विस्मयचकित झाला !

"मच्छन्दादेव ते ब्रह्मन् प्रवृत्तेयं सरस्वती"—'सोऽनुव्याहरणात् भूयः शोकः श्लोकत्व मागतः । ' या दोन श्लोकार्धांत वाल्मीकीच्या श्लोकाचा सर्व वृत्तांत आला आहे. ब्रह्मदेवाच्या प्रेरणेने ती वाणी प्रवृत्त झाली, आणि त्या वाणीने शोकवृत्तीला करुण व्यंजक श्लोकाचें रूप दिलें. येथे प्रत्यय स्थानीय शोक आहे व त्याला श्लोकाचें स्वरूप देणारी दिव्यशक्ति प्रतिभा आहे. महाकवींच्या वाणींतून काव्यवस्तु स्यंदित होत असतांनाच ही प्रतिभाहि व्यक्त होत असते. साध्या भावांचे अलौकिक रसांत परिवर्तन करणाऱ्या या दिव्य शक्तीच्या योगानेच कवीला क्रांतदर्शित्व प्राप्त होत असतें. ध्वनिकार म्हणतो–

> 'सरस्वती स्वादु तदर्थवस्तु निष्यंदमाना महतां कवीनाम् ।
> अलोकसामान्यमभिव्यनक्ति परिस्फुरन्तं प्रतिभाविशेषम् ॥ '

वैदिक ऋषींच्या सूक्तांना हें वर्णन लागू पडतें काय हें आता पाहावयाचें–

रहुगणाचा पुत्र गोतम म्हणतो—

> अतारिष्म तमसस्पारमस्य
> उषा उच्छन्ती वयुना कृणोति ।
> श्रिये छन्दो न स्मयते विभाती
> सुप्रतीका सौमनसायाजीगः ॥
> भास्वती नेत्री सूनृतानाम्
> दिवःस्तवे दुहिता गोतमेभिः । (१-९२- ६।७ अ,ब.)

—आम्ही अंधकाराच्या पार पडलों. अंधकाराचा नाश करणारी ही उषा वस्तुजाताला प्रकट करीत आहे. ही प्रकाशमान उषा, वश करण्याकरिता जणुं, मधुर हंसते. त्या सुखस्वरूप उषेने आम्हाला जागें केलें आहे. आम्ही प्रसन्न झालों आहोंत. ही स्वर्गकन्या कांतिमान् उषा सूनृतांना वाहून आणणारी आहे. गोतमांकडून तिचें स्तवन होत आहे.

एकट्या गोतमालाच उषेमुळे स्फूर्ति आली असें नाही. तोच कवि पुढे म्हणतो—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विश्वानि देवी भुवनाभिचक्ष्या
प्रतीची चक्षुरुर्विया विभाति ।
विश्वं जीवं चरसे बोधयन्ती
विश्वस्य वाचमविदन्मनायोः ॥९॥

—ही देवी उषा सर्व भुवने पाहाते ; आणि आपल्या तेजाने सर्वत्र प्रकाशते. ती सर्व प्राण्यांना जागे करून कामाला लावते आणि सर्व कविजनांना वाचा फोडते.

उषा कवींना जागे करून गाण्याकरिता प्रवृत्त करते. उषेचें हास्य पाहिल्या बरोबर कवि प्रसन्न होतो व गायला लागतो. उषा ही स्वर्दुहिता आहे. ती कांतिमान् असून जगाला कांतिमान् करते. उषा ही सूनृतांची नेमी आहे म्हणून वागूदेवता आहे. पाहा—

चोदयित्रि सूनृतानां चेतन्ती सुमतीनाम् ।
यज्ञं दधे सरस्वती । (१-३ ११)

उषा गोतमांकडून स्तविली जाते. तिचें स्तवन आपोआप होत आहे. गोतमांकडे स्तवनाचें कर्तृत्व नाही. त्यांच्या मुखातून तें आपोआप बाहेर पडत आहे. वसिष्ठ ऋषि म्हणतो—

इयं वामस्य मन्मन इन्द्राग्नी पूर्व्यस्तुतिः ।
अभ्राद्वृष्टि रिवा जनि ॥ (७-९४-१)

—हे इंद्राग्नीनो, ही तुमची उत्कृष्ट स्तुति या स्तोत्यापासून आकाशांतून पाऊस पडावा त्याप्रमाणे बाहेर पडली आहे.

महाकवीची उत्कृष्ट कृति पावसाइतक्याच सहजतेने बाहेर पडत असते—
'सरस्वती स्वादु तदर्थवस्तु निष्यंदमाना महतां कवीनाम् ।"

उषा ही तर कवींची स्फूर्ति देवताच आहे. तेव्हा उषः सूक्तांत असे विचार सांपडतात यांत विशेष नाही. पण यज्ञाशी ज्यांचा निकट संबंध आहे अशा अग्नि, इंद्र आणि सोम यांच्या सूक्तांतूनहि ऋषि काय म्हणतात तें पाहा—

दीर्घतमा ऋषि म्हणतो—

प्र तव्यसीं नव्यसीं धीतिमग्नये
वाचो मतिं सहसः सूनवे भरे । (१-१४३-१)

—ज्यांतील शब्दांतून माझें हृद्गत व्यक्त होत आहे असें अत्यंत नवीन आणि अत्यंत उत्साहवर्धक असें हें स्तोत्र मी सहस्पुत्र अग्नीकरिता करतो.

वसिष्ठ ऋषि म्हणतो—

न सोम इन्द्रमसुतो ममाद
नाब्रह्माणो मघवानं सुतासः ।
तस्मा उक्थं जनये यज्जु जोषत्
नृवन्नवीयः शृणवद्यथा नः ॥ (७-२६-१)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—सोमरस काढला नाही तर इंद्राला आनंद होत नाही. सोमरस काढला पण स्तोत्रें म्हटलीं नाहीत तरी त्याला आनंद होत नाही. मी आता एक असें नवीन स्तोत्र रचतों की जे इंद्र आनंदित होऊन माणसाप्रमाणे (उत्कंठेने) ऐकील.

कण्वाचा पुत्र प्रस्कण्व म्हणतो—

> अपामिवेदूर्मयस्तर्तुराणाः
> प्र मनीषा ईरते सोममच्छ। (९-९५-३)

—पाण्याच्या तरंगाप्रमाणे उल्हासाने नाचणारीं आमचीं स्तोत्रें सोमाला प्रेरणा देतात.

प्रतर्दन म्हणतो—

> प्र धीवपद्वाच उर्मि न सिन्धुः
> गिरः सोमःपवमानो मनीषाः। (९-९६-७)

—नदी वाहात असताना ज्या प्रमाणे खळखळ लाटा उत्पन्न करते त्याप्रमाणे पवमान सोम हृदयंगम स्तोत्रांना प्रेरणा देतो.

यज्ञाशी घनिष्ठ संबंध असलेल्या देवतांच्या स्तोत्रांतूनसुद्धा कवींचा भाव व्यक्त होतो. इंद्र एवढा सोमाचा भोक्ता, पण सोमापेक्षाहि त्याला आवडतील अशी तीं स्तोत्रें आहेत. पाण्यावर तरंग नाचताना पाहून जसा आनंद होतो तशा प्रकारचा आनंद स्तोत्रांनी सोमाला होतो. आणि सोमहि स्तोत्रांना अशी प्रेरणा देतो की नदीतील लाटां प्रमाणे ती खळखळ करीत यावीत. बरें, अग्नि, इंद्र, आणि सोम म्हणजे सामान्य व्यक्ति नव्हत. देवांचेहि ते कवि आहेत.[१] पण त्यांनाहि आनंद होईल अशी नवीन नवीन रचना ऋषींनी केली आहे—"अलोक सामान्यमभिव्यनक्ति परिस्फुरन्तं प्रतिभाविशेषम्।"

वैदिक ऋषींची प्रतिभा धार्मिकतेच्या भावनेतून उदयास आली असें मानण्यांत येते. धार्मिकतेतून जन्माला आली म्हणून प्रतिभेचें स्वरूप पालटत नाही. उलट त्यामुळे सूक्तांना तेज आणि पावित्र्य आलें आहे. महाराष्ट्रांतील संतकवींची वाणी कशी उच्च पवित्र व स्फूर्तिप्रद आहे! अगदी तशींच सूक्तेंहि पण आहेत. शिवाय ऋग्वेदांत केवळ स्तोत्रेंच नाहीत, इतरहि लौकिक विषय आहेत. आणि त्या लौकिक विषयांनाहि आपल्या अपूर्व निर्माणक्षम प्रज्ञेने ऋषींनी अलौकिकता आणली आहे. ऋग्वेदांत स्तोत्रांबरोबरच पोवाडे आहेत. प्रेमगीतें आणि लोकगीतें, नाट्यगीतें आणि आख्याने, सृष्टिगीतें आणि

---

१ अग्नि, इंद्र आणि सोम यांच्या कवित्वशक्तिबद्दलचे निर्देश ऋग्वेदांत अनेक आहेत. उदा०—०३-२१-३; ६-१४-२; ८-१६-७; ९-१०७-७; १०-११२-९ इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावगीतें, उपदेश आणि विनोद, तत्त्वज्ञान आणि गूढगीतें इत्यादि अनेक प्रकार आहेत. ऋग्वेद हा एक गीतांचा मोठा संग्रह आहे. संहिताकारांनी त्यांना त्यावेळीं उपयुक्त वाटलेल्या पद्धतीने ती गीतें एकत्र केलीं. आपल्याला इच्छा असलेल्या पद्धतीने आपल्याला तीं अभ्यासिता येतील.

शिवाय प्रतिभेचा उगम धार्मिकतेतून झाला याबद्दल आश्चर्य मानण्याचें कांही कारण नाही. कवित्वाचें कारण प्रतिभा, धार्मिकतेचें कारण श्रद्धा, आणि तत्त्वज्ञानाचें कारण जिज्ञासा या सर्वांचा जन्म "आत्मानुभूतीची तळमळ" या एकाच आईच्या पोटीं झाला आहे. व सर्वांचें ध्येयहि एकच आहे. एकाच सद्वस्तूचा सौंदर्य, शिव आणि सत्य रूपानें प्रत्यय घेण्याचे हे मार्ग आहेत. कवीचें क्रांतदर्शित्व, भक्ताची उन्मनी अवस्था, व तत्त्वज्ञाचा वृत्तिभेद हे पुरुषाला एकाच अवस्थेत नेऊन सोडतात. काव्याचें पर्यवसान आत्मप्रत्ययांत, भक्तीचें पर्यवसान आत्मनिवेदनांत व तत्त्वज्ञानाचें पर्यवसान आत्मावबोधांत होतें. उत्तम कवि हा तत्त्वज्ञ आणि भक्त असतो, तर उत्तम भक्त हा तत्वज्ञ आणि कवि असतो. आपल्या ज्ञानेश्वर महाराजांचेंच उदाहरण. ते तर तत्त्वज्ञ भक्त आणि कवि होते. ज्ञानेश्वरीला आपल्या महाराष्ट्र शारदेच्या मुकुटांतील हिरा आपण मानतों. वारकरी लोक तिला धर्मग्रंथ म्हणून मानतात आणि तत्त्वज्ञ 'ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' शोधतात. जसें ज्ञानेश्वरांचें तसेंच तुकाराम महाराजांचें. त्यांचे अभंग हे 'अभंग वाङ्मय' आहे. त्यांच्यात जीवनाचें सार सर्वस्व साठविलें आहे. आणि वारकऱ्यांचा तो 'महाराष्ट्र वेद' आहे. वैदिक ऋषींचेंहि असेंच होतें. आणि याची त्यांना जाणीवहि होती. एक ऋषि म्हणतो—

मनीषिणः प्रभरध्वं मनीषां
यथा यथा मतयः सन्ति नृणाम ।(१०-१११-१)

—कवींनो, तुम्ही तसतशी काव्यें करा की जसजशी लोकांची मनें असतील.

प्रतिभा ही विलक्षण दैवी शक्ति आहे. तिच्या जोरावरच कवि सृष्टीतील सौंदर्याचा अनुभव घेऊन काव्याच्या रुपानें तो इतरांनाहि देऊं शकतो. असेंच काव्य अक्षर वाङ्मय होऊं शकतें. वैदिक ऋषींनी आत्मप्रत्ययाने मंत्र रचले याचा पुरावा यास्कहि देतो—

" साक्षात्कृतधर्माण ऋषयो बभूवुः ।
तेऽवरेभ्योऽसाक्षात्कृतधर्मभ्य उपदेशेन मन्त्रान् संप्रादुः । (निरुक्त १-२०)

ऋग्वेदांतील सूक्तें 'साक्षात्कारावर' अधिष्ठित असल्याने तीं 'अक्षर' आहेत. व ऋषींचाहि असा अभिप्राय आहे. एक ऋषि म्हणतो—"देवाचीं चरित्रें आम्ही आमच्या गीतांतून अशीं आकर्षक शैलीने वर्णन करूं की पुढील युगांतहि हीं गीतें म्हटलीं असतां ती (चरित्रें) लोकांना दिसतील." (१०-७२-१). हीच मूळ ऋचा या लेखाच्या शीर्षस्थानीं दिली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'साक्षात्कृतधर्मत्वाच्या' किंवा 'आत्मप्रत्ययाच्या' अवस्थेतील कवि 'विगलितवेद्यांतर' झालेला असल्याने त्याचा अहंप्रत्यय नाहीसा झालेला असतो आणि आपलें काव्य स्फूर्ति देवतेचा प्रसाद आहे असें त्यास वाटावयास लागतें. या अनुभवाचा उल्लेख अनेक ठिकाणीं आला आहे. एक ऋषि म्हणतो--

ब्रह्मा कृणोति वरुणो गातुमिदं तमीमहे ।
व्यूर्णोति हृदा मतिं नव्योजायता मृतम् ।
वित्तं मे अस्य रोदसी ।। (१-१०५-१५)

--वरुण आमचीं स्तोत्रें तयार करतो; आम्ही फक्त त्याचे गायक आहोत. तो आमच्या स्तोत्रांत रस ओततो, म्हणून तीं अगदी नवीन होतात. द्यावा-पृथिवींनो आमचें हें स्तोत्र लक्षांत घ्या.

अध्यात्मवादी कवींचा हाच अनुभव आहे. "जो सर्वोपकारी समर्थु । सद्‌गुरु श्री निवृत्तिनाथु । राहटत असे मजहि आंतु । रिघोनिया ।। आता आयती गीता वर्गी । मी सांगे मराठीया भंगी । येथ के विस्मया लागी । ठावो आहे ।।" (ज्ञा. १८। १७२८-२९)

असें ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, तर "काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परी त्या विश्वंभरें बोलवीलें ।।" असें तुकाराम महाराज सांगतात. हा त्यांचा प्रत्यय आहे; केवळ तोंड देखली विनम्रता नाही.

हा सर्व त्या दैवी वाणीचा प्रभाव आहे आणि ही वाणी आत्मप्रत्ययवान् ऋषींच्याच ठिकाणीं स्थित आहे.--'तामन्वविन्दन् ऋषिषु प्रविष्टाम्'--या दैवी वाणीचा प्रभाव अलौकिक आहे. तीच मनुष्याला ज्ञानी आणि श्रेष्ठ करते. वाणी-सूक्तामध्यें (१०-१२५) वाणीच्या तोंडी असें वचन आहे--

अहमेव स्वयमिदं वदामि
जुष्टं देवेभिरुत मानुषेभिः ।।
यं कामये तं तमुग्रं कृणोमि
तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम् ।। ५ ।।

--वाणी म्हणते--'देव आणि मनुष्यांनीं जें ज्ञान अनुभविलें आहे तें सर्व मी स्वतःच सांगतें. मी ज्याला इच्छितें त्याला श्रेष्ठ करतें, त्याला ब्रह्मा करते, त्याला बुद्धिमान् करतें.

ही वाग्देवता आपल्याला प्रसन्न व्हावी म्हणून ऋषींना अगदी तळमळ लागली आहे. दिर्घतमा ऋषि म्हणतो--" त्या धेनूच्या (वाणीच्या) मागे फिरणारा हा वत्स ओरडत आहे; आणि गोठ्याच्या आड उभी असलेल्या तिचें हंबरणें त्याला ऐकू येतें. आपल्या ज्ञानाच्या योगाने विजप्रमाणे ती चकाकत आहे आणि या मर्त्याला तिने मागे टाकलें आहे (१-१६४-२९)...हें सर्व मीच आहे याची जाणीव मला अजून होत नाही. मानसिक बंधनांनी मी अजून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जखडलों आहे. ज्यावेळीं त्या ज्ञानाचा मला अनुभव येईल त्यावेळींच तो वाणीचा दिव्य भागहि मला प्राप्त होईल (३७)...वाणीची चार रूपें गणलीं आहेत. ज्ञानवान् पुरुषांनाच तीं अवगत होतात. त्यांतलीं तीन रूपें गुप्त आहेत. तीं सामान्य माणसाला दिसत नाहीत. लोक फक्त वाणीचें चवथें रूपच बोलत असतात. (४५)...आणि शेवटी अगदी तळमळून तो ऋषि म्हणतो--

'यस्ते स्तनः शशयो यो मयोभू
—येंव विश्वा पुष्यसि वार्याणि ।
यो रत्नधा वसुविद् यः सुदत्रः
सरस्वति तमिह धतवे कः ॥ (१-१६४-४९)[१०]

—'हे आई सरस्वती, जो तुझा स्तन अत्यंत सुखदायक असून सर्व जगाला पोसतो, आणि जो रत्नें व संपत्तीने युक्त असून उदार आहे, तो येथे तूं मला पिण्याकरिता कर.'

पण ज्या महाभागांना या दिव्य शक्तीचा प्रत्यय आला त्यांची 'आबि आनंदु आनंदु' अशी अवस्था होत असे. 'मला माझ्या पित्याकडून सत्याचें ज्ञान झालें, आणि मी नवीन होऊन सूर्याप्रमाणे पुनः जन्मास आलों' (८-६-१०) असे एक ऋषि ह्मणतो, तर अत्रि ऋषि ह्मणतो—

प्रसूमहे सुशरणाय मेधां
गिरं भरे नव्यसीं जायमानाम् । (५-४२-१३)

—त्या रुद्राकरिता माझी ध्यान बुद्धि स्फुरण पावली आहे, आणि तिच्यातून ही माझी अपूर्व वाणी बाहेर येत आहे.

चराचरांतील सत्यस्वरूप व्यक्त करणारी वाणी परमेश्वरांतच स्थित असते—वाक् पतङ्गाय धीयते—आणि ज्ञाते लोक त्याच वाणीला व्यक्त करीत तिचें रक्षण करीत असतात.

पतङ्गमक्तमसुरस्य मायया
हृदा पश्यन्ति मनसा विपश्चितः ।
समुद्रे अन्तः कवयो विचक्षते
मरीचीनां पदमिच्छन्ति वेधसः ॥
पतङ्गो वाचं मनसा बिभर्ति
तां गन्धर्वोऽवदद् गर्भेऽन्तः ।
तां द्योतमानां स्वर्यं मनीषां
ऋतस्य पदे कवयो नि पान्ति ॥ (१०-१७७-१,२)

—परमेश्वराच्या शक्तीने युक्त असलेल्या त्या पतंगाला (पक्ष्याला) ज्ञाते लोक आपल्या हृदयस्थ मनाने पाहतात. कवि त्याला समुद्रांत शोधतात आणि

१० हें संपूर्ण सूक्त अत्यंत गूढ विचारांनी भरलेले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपासक किरणांच्या मार्गाचा आश्रय करतात. तो पतंग आपल्या मनाने वाणी धारण करतो. हृदयस्थ गंधर्व त्यावाणीचा उच्चार करतो. आणि उज्वल आणि स्वर्गीय अशा त्या ज्ञानाचें (मनीषा) ऋताच्या आधारावर कवि रक्षण करीत असतात.

हा पतंग म्हणजे हृदयस्थ आत्मा होय. या आत्म्याचेंच विश्वात्मक रूप म्हणजे सविता होय. सविता हा सर्व चराचराचा आत्मा आहे--सूर्य आत्मा जगतः तस्थुषश्च--या सवित्याचीच उपासना उपनयन प्रसंगीं आपण पित्याकडून घेतली असते. व दररोज प्रातःसायं "अपूर्व निर्माणक्षमा प्रज्ञा दे" अशी आपण त्या सवित्याची प्रार्थना सावित्री मंत्राने (गायत्री मंत्राने) करीत असतों--

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥ (३-६२-१०)

--त्या सवितृ देवाच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों, की जो आमच्या बुद्धीला प्रेरणा देईल.

बुद्धीच्या प्रेरक देवतेची उपासना करण्यास विश्वामित्र आपणाला सांगतो आणि विश्वामित्राच्या या शब्दांतच आपला पिताहि आपल्याला सांगतो. पण वैदिकऋषि एवढेंच सांगून थांबत नाहींत. उपनयन प्रसंगीच ज्ञानसूक्त (१०-७१) म्हणतात. त्यामध्ये विद्वानाचें लक्षण केलें असून त्याचा आदर्श आपणासमोर ऋषींनी उभा केला आहे. संपूर्ण सूक्त अकरा ऋचांचें आहे. संपूर्ण देण्याचा मोह कष्टाने आवरावा लागतो. त्यांतील कांही ऋचा मात्र वाचकाकरिता येथे देत आहें. त्यावरून ऋषींच्या काव्यविषयक कल्पनांचा थोडक्यांत बोध होईल.

आपल्या हृदयांतील विचारांना शब्दांचें स्वरूप देऊन ते विचार दुसऱ्याच्या हृदयांत संक्रांत होणें हें वाणीचें कार्य म्हणजे एक फारच मोठें आश्चर्य आहे अशी सुरुवात करून सूक्तकार म्हणतो

सक्तुमिव तितउना पुनंतो
यत्र धीरा मनसा वाच मक्रत ।
अत्रा सखायः सख्यानि जानते
भद्रैषां लक्ष्मी र्निहिताधि वाचि ॥२॥

--जसा कोणी सातूचें पीठ चाळून चाळून व त्यांतला कोंडा काढून तें स्वच्छ करतो तसे अलौलिक बुद्धीचे लोक आपल्या मनाच्या चाळणीतून आपली वाणी (काव्य) गाळून काढतात. अशा काव्य कृतींचें मर्म फक्त सहृदयच (सखायाः) ओळखूं शकतात. कारण अशा कृतींत अर्थ संपत्ति खचून भरली असते.

वैदिकसूक्तें रचणारे कवि कोणत्या काव्यकृतीची आणि कोणत्या वाचकांची अपेक्षा करितात हें येथे दिसतें. काव्य तर तसें सर्वच वाचतात आणि ऐकतातहि पण काव्य सर्वांनाच कळतें असें नाही. सूक्तकार सांगतो--

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत त्वः पश्यन्न ददर्श वाचम्
उत त्वः शृण्वन्न शृणो त्येनाम् ।
उत त्वस्मै तन्वं विसत्रे
जायेव पत्य उशती सुवासाः ॥४॥

—एक जण कविता पाहातो पण त्याला ती दिसत नाही. एकजण म्हटलेली कविता ऐकतो पण खरोखर तो ऐकत नाही. उत्तम वस्त्रें धारण केलेली युवति ज्याप्रमाणे मोठ्या प्रेमाने आपल्या पतीसमोरच आपल्या सौंदर्याचा आविष्कार करते त्याप्रमाणे कविता आपलें खरें स्वरूप एखाद्यालाच प्रकट करते.

रसिक आणि अरसिक यांच्यामधला भेद येथे मार्मिकपणें दाखविला आहे. रसिक कवीच्या श्रमाचें चीज रसिक कवी कडूनच होते. कित्येक लोक अर्थ न समजताच कविता पाठ करितात. अशा कविता संग्राहाचा भार वाहणाऱ्यांना सूक्तकाराने 'स्थिरपीत' (केवळ भारवाही) म्हटलें आहे. कविता करतात म्हणून सर्वच कवि सारखे असें म्हणता येत नाही. कवीच्या जगांत कांही कविद्रुवहि असतातच. याबद्दल सूक्तकार म्हणतो—

अक्षण्वन्तः कर्णवन्तः सखायः
मनोजवेषु असमा बभूवुः ।
आदघ्नास उपकक्षास उ त्वे
ह्रदा इव स्नात्वा उत्वे ददृश्रे ॥७॥

—एकत्र विद्या व्यासंग करणारे लोक डोळ्यांनी व कानांनी सारखे असतील पण मनाच्या भरारीत ते सारखे नसतात. त्यां पैकी कांही उथळ डबक्या सारखे (आदघ्नासः) कांही मध्यम (उपकक्षासः), तर थोडेच खोल डोहासारखे (स्नात्वा) असतात.

जेव्हा कवीकवींमध्ये स्पर्धा चालते तेव्हा 'हृदा तष्टेषु मनसो जवेषु—कल्पनेची भरारी, बुद्धीची सूक्ष्मता, आणि चमत्कृतीचे कौशल्य यांत पटाइत असलेले कवि इतरांना केव्हाच मागे टाकतात व काव्य प्रदेशात स्वच्छंद विहार करितात. परंतु जे इकडेहि नसतात आणि तिकडेहि नसतात, ते काव्यरसाहि निर्माण करूं शकत नाहीत (न ब्राह्मणासः) किंवा सोमरसहि काढण्यास निरुपयोगी ठरतात (न सुते करासः) काव्य रचनेत अशा लोकांची गति जाळें विणणाऱ्या विणकऱ्याच्या बायकोप्रमाणे होते. जेव्हा सभेमध्ये काव्य स्पर्धा चालते अशावेळी केवळ काव्याचा संग्राहक किंवा शद्बजाल विणणारा कांही उपयोगी नसतो. ब्रह्म (उत्तम कविता प्रकार) निर्माण करणाराच अशा ठिकाणी जाऊं शकतो व सभा जिंकून आला म्हणजे त्याची सर्वत्र वाहवा होते. असें सांगून सूक्तकार खालील ऋचेने आपलें

 सूक्त संपवितो—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऋचां त्वः पोषमास्ते पुपुष्वान्
गायत्रं त्वो गायति शक्वरीषु
ब्रह्मा त्वो वदति जात विद्याम्
यज्ञस्य मात्रां वि मिमीत उत्वः ।

—कोणी एक आपल्या जवळच्या ऋचांचा संग्रह वाढवण्यांतच गर्क असतो, कोणी सामगानाच्या ठिकाणीं गायत्रें म्हणण्यातच निपुण असतो, ब्रह्मा हा आपल्याला स्फुरलेलें काव्य म्हणून दाखवितो, ज्ञानयज्ञाचें खरें स्वरूप खरोखर फारच थोड्यांना कळतें.

या सूक्तांतील वैदिक ऋषींची काव्य विषयक कल्पना पहिल्या वर सूक्त कारांच्या कवित्वाविषयी आणखी पुरावा देण्याची जरूर नाही. आज आपण उपनयनाचा तमाशा करतों ही गोष्ट वेगळी. पण विद्यार्थ्यासमोर उपनयन प्रसंगी हा आदर्श ठेवण्यांत येत असे. वैदिक कालीन विद्वानाचा हा आदर्श म्हणजे कवित्वाचाच आदर्श नाही काय? वैदिक ऋषींच्या मतें द्रष्टेपणा आणि कवित्व वेगळें नाहीच. ऋषि आणि कवि एकच होत. द्रष्टेपणाशिवाय कवित्व नाही ही गोष्ट आपल्या साहित्य शास्त्रांतहि सांगितली आहे. भट्ट तौत म्हणतो—

नानृषिः कविरित्युक्तं ऋषिश्च किल दर्शनात् ।
विचित्रभावधर्मांश तत्त्वप्रख्या हि दर्शनम् ॥
स तत्त्वदर्शनादेव शास्त्रेषु प्रथितः कविः
दर्शनाद्वर्णनाच्चापि रूढा लोके कवि श्रुतिः ॥

या कसोटीस उतरणारी काव्य रचना ऋग्वेदांत विपुल आहे. शुनःशेपाची सूक्तें करुण रम्य आहेत. तर गृत्समद पोवाडे गाणारा कवि आहे. इंद्राच्या पोवाड्यांपैकी कांही उत्तम पोवाडे गृत्समदाचे आहेत. विश्वामित्राचें काव्य जयिष्णु आणि वर्धिष्णु आहे. विश्वामित्र वैदिक धर्माचा फार मोठा प्रसारकर्ता होता. त्याचे जयिष्णु आणि 'सत्यधर्मा'च्या प्रसाराचे विचार इंद्रसूक्तांत तर दिसतातच पण अग्निसूक्तांतहि दिसतात. त्याचा अग्नि गमनशील आहे. नदीसंवादांत सुद्धा या आपल्या उद्योगाचा निर्देश करण्यास तो विसरत नाही. वसिष्ठांची ब्रह्मज्ञता तर प्रसिद्धच आहे. त्याच्या काव्यातून आत्मनिष्ठेची गूढता व भक्तीची आर्तता प्रत्ययास येते. तो मित्रावरुणांचा पुत्र व देवांचा कवि आहे. त्याचा महिमा सूर्याप्रमाणे प्रखर व समुद्राप्रमाणे अगाध आहे. त्याच्या प्रतिभेचा वेग वाऱ्याप्रमाणे आहे, तिचा पाठलाग करता येत नाही. दुर्ज्ञेय आणि सहस्रशाखी सृष्टीला त्याने अंतःस्फूर्तीनें जाणलें. उर्वशीने त्याला जन्म दिला तेव्हा यमाने (कालाने) विणलेल्या वस्त्रामध्ये अप्सरांनी त्याला ठेविलें. मित्रावरुणांनी त्या बालकाला पाहिलें तेव्हा तें नुसतें विद्युल्लतेप्रमाणे तळपत होतें. दिव्यब्रह्मतेजाने प्रकाशणाऱ्या त्या बालकाला विश्वेदेवांनी कमलामध्यें ठेविलें व मधुबिंदूंनी त्याचें संगोपन केलें. (७-३३-८ ते १२)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११
गरी

अत्यंत तीक्ष्ण बुद्धीच्या वसिष्ठाला प्रत्यक्ष वरुणाने ब्रह्मज्ञान दिलें. जेव्हा वसिष्ठ आणि वरुण नौकेंत बसले आणि ती नौका समुद्रावर सोडली तेव्हा पाण्याच्या तरंगावर ती नौका हलत असता मजेनें झोक्यावर बसल्यासारखें त्याला वाटत होतें. वरुणाने त्याला आपल्या प्रभावाने कर्तृत्ववान् केलें. आणि वरुणाचा तो लाडका पुत्र शेवटीं मैत्रभावाने आपल्या पित्याच्या सहस्रद्वाराच्या गृहांत प्रवेश करता झाला. (७-८८-३००-५).

पण या एवढ्या ब्रह्मनिष्ठ ऋषीचें हृदय, काव्याचें स्थान व भक्तीचें माहेर-घर होतें त्याला स्वर्गाचा प्रकाश व सौंदर्य प्रतित होत होतें. (७-८८-२) वरुणाचा तो स्वकीय आणि लाडका असूनहि आपला अपराध तर होत नाहींना असें त्याला वाटत असे. 'आह्मी पातकी आहोंत, आह्मी केवळ उपभोगांतच गर्क आहोत, आमच्या कडून लोकांचा द्रोह तर होत नसेल ना ! आमच्या हातून कर्तव्यपालनांत चूक तर होत नसेल ? ' अशी शंका त्याला येते ' मी वरुणाचा विश्वास कसा संपादन करीन बरें ? वरुण कृपायुक्त दृष्टीने माझ्याकडे पाहील कां ? माझे अपराध पोटांत घालून तूं मला पदरांत घे...' इत्यादि अनेक प्रकारें करुणा भाकून अखेर देवांना तो इतकेंच मागणें मागतो—"यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ।"

विवेचन संपलें. साहित्याच्या दृष्टींतून ऋग्वेदाचा अभ्यास केल्यास ऋग्वेदाचें महत्व आजहि ताजें वाटेल व त्या पासून अनेक प्रेरणा मिळतील. या अभ्यासाची थोडीशी कल्पना यावी या हेतूनेच हें विवेचन केलें आहे. आपल्या बुद्धीला प्रेरणा मिळावी म्हणून ज्या सूर्य देवाची आपण रोज प्रार्थना करतों त्यालाच अखेर हें मागणें मागूं या—

चक्षुर्नो धेहि चक्षुषे चक्षुर्विख्यै तनूभ्यः ।
सं चेद वि च पश्येम ॥ (१०-१५८-४)

— आमच्या डोळ्यांना दृष्टि दे आणि आमच्या अंगांना अवलोकनार्थ शक्ति दे, म्हणजे आम्हीं हें सर्व निरखून पाहूं.

ह रि ह रे श्व र मु द्र णा ल य
महाल चौक—नागपूर.

उत्कृष्ट एकरंगी व बहूरंगी छपाई आणि इतर सर्व प्रकारच्या छपाई कामाकरतां एक वेळ अवश्य संधी द्या. एम्बॉस छपाई व उत्तम बांधणी आमचें विशेष.

व्यवस्थापक.

२३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मृ दु ला

केशव केळकर

☆

[सरावाने नेहमीच्या जीवनांतली चमत्कृति वा सौंदर्य चटकन् उमगत नाही. पांढऱ्यावर काळें केलें तरी रोजच्या जीवनाचा प्रकाश त्यांतून चमकत नाही. नभोवाणी ही अशरीरी वाणी आहे आणि "आकाशवाणी"सारखाच तिचा आघात मनावर होतो. त्या आघाताने ज्या जीवनसैंदर्याचा कस लागला तें पुन्हा पांढऱ्यावर काळें करून वाचकांच्या पुढ्यांत सादर करण्याचा हा प्रयत्न आहे—आंधळ्यासाठी असलेल्या नाटकाचा पुन्हा डोळसांसाठी प्रयोग.]

विमल—मृदुल–ए ऽ मृदुल–मृदू ऽ ऽ ल

वसंत—अग, कां हांका मारते आहेस तिला ! काय हवंय् तुला !

विमल—मृदुला ऽ – अग तुला ऐकू येतं कीं नाही तुला !

वसंत—अग पण तुला काय हवय् तें तर सांगशील कीं नाही! मला सांग मी आणून देतों.

विमल—मृदुल– इकडे ये म्हणते आहे नं मी! आत्तां हितं होती. काय बहिरी झालीस कीं काय !

वसंत—बाहेर गेली असेल कुठं ती! तिला ऐकूं नसेल गेलं तर ओ कशी देईल तुला ती ?

विमल—बाहेर कसली गेलीय! सगळ्या कारट्यांचा घोळका घेऊन बसली होती कीं, अंगणांत. मृदुला ऽएक मिनिटांत आली नाहीस तर·········

मृदुला—(येत) काय ग आई! कां ओरडतेआहेस सारखी! घटकाभर खेळूं सुद्धा देत नाहीस आम्हांला.

विमल —मी ओरडतें आहे? आणि तुला ओ सुद्धां देता येत नाही वाटतं? कान फुटलें होते वाटतं तुझे!

मृदुल—वा ग वा! आमचे कान फुटावत वाटतं! म्हणजे आम्ही तुला ओ दिली असती, तर आम्हांला ऐकूं आलं असं तुला कळलं असतं! आणि मग डाव अर्धाच टाकून यायचं वाटतं आम्ही?

विमल—याचा अर्थ तुला ऐकूं येऊन ओ दिली नाहीस नं तूं! असं खोटं बोलायला कुठं शिकलीस तूं हं?

मृदुल—यांत काय खोटें वागलें ग आई मी. डाव अर्धा सोडून आलें असतें तर मुलींनी चिडवलं असतं ना आम्हांला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विमल—आणि आई तुझी इतकी कंठशोष करीत होती तें.....

वसंत—विमल, आतां कशाला वाढवतेस हे. मृदुल, तुझा डाव अर्धा राहिला असेल तर पुरा खेळून ये तूं.

मृदुल—हो आत्ता येतें.

वसंत—पण हें बघ पुन्हा कधीं हांक मारली तर ओ द्यायची आईला. फार तर खेळतें आहें असं सांगावं. !

मृदुल—हो ! म्हणजे मग ओऽच करीत रहावं लागेल आम्हांला ! बरं जा ऽ ऽ ते ऽ ऽ [जाते.]

विमल:—(थांबून) असा मुलांसमोर प्रत्येक वेळी पाणउतारा करतां माझा!

वसंतः—मीं पाणउतारा केला तुझा आतां !

विमल: —नाही ! सन्मानच केलांत ! चांगला मान राखलात ! माझं न ऐकायचं चांगल शिक्षण देतांहात तुम्ही तिला ! मी तिला शिस्त लावायला बघते—आणि—

वसंत—आणि मी तिला बिघडवतों असंच नं !

विमल—हो, तुम्हीच पोरीला लाडावून ठेवतां. ती म्हणेल, तसं वागूं देतां ! साहजिकच तुमच्याशी ती लाडांत येते.

वसंत—अग, मग पोरगी तुझीही आहे. तूं पण लाडाव कीं तिला ! मी काय नाही म्हणतों आहें ?

विमल—पोरीला मला पुरतं बिघडवायचं नाही.

वसंत—म्हणजे अर्धी मी बिघडवली आहे तर ?

विमल—तें माझ्या तोंडून कां वदवतां ? तुम्हांला गंमत वाटत असेल. आईचं न ऐकणारी पोरगी आपलं ऐकते. मग गरज काय तुम्हांला बाकी गोष्टींची!

वसंत—ही चूक आहे तुझी. तुला असं वाटतं ती माझं ऐकते ?

विमल—नाही ! माझं ऐकते ती !

वसंत—ती कुणाचंच ऐकत नाही. मी तिच्या कलानं घेतों. आणि तूं तिला आपल्या कलानं वागवूं पाहतेस. येवढाच तुझ्या माझ्या वागण्यांतला फरक !

विमल—मी तिला शिस्त लावायला पाहाते. ती शिस्त बिघडविण्याचं काम तुम्ही करतों !

वसंत—चूक आहे तुझी. विमल ! दुसऱ्याच्या वागण्यांतल्या खोडी काढण्यापेक्षा स्वतःचंच कुठं चुकतं कां हें पाहाशील कां तूं ?

विमल—म्हणजे मीच वाईट ! धन्य आहे तुमची. म्हणतात ना शेळी जाते जिवानिशी आणि...

वसंत—कांही कुणाचा जीव जात नाही. झालंय् काय असं जीव जायला ? आई असून पोरीचा स्वभाव तुला कळतं नाही, आश्चर्य आहे ! मृदुला अतिशय मनस्वी आहे ! ती तुझं काय, तिच्या बापाचंहि ऐकायची नाही. ती अतिशय बुद्धिमान आहे, तशीच तापट आणि अभिमानी आहे. लहानपणी ह्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिमानाला करपून टाकलं तर मग मुलं शेळपट व निर्जीव होतात. अग धसमुसळेपणा, आक्रस्ताळेपणा यांतच तर तेज आहे तुझ्या मुलींचं. '

विमला–हें बरं आहे! माझ्या मुलीचे खोटे गुण गाऊन मला निरुत्तर करण्याचा कशाला प्रयत्न करतां?

वसंत–मी तुला निरुत्तर करणं शक्य नाही! तुला माहीत आहे हें. पण हें बघ. अशा मनस्वी मुलीला तुझ्या धाकानं, नजरेच्या तिरिपीनं कोमेजून टाकण्यापेक्षां तिला आपलं माझ्या सावलीत–

विमल––काय म्हणालांत? माझं ऊन आणि तुमची सावली काय?

वसंत––अग, नाही तर काय? तुझ्या आईपणाची वेसण तूं आपल्या पोरीला घालूं पाहते. पण ती गरीब बिचारी गाय. दावंच तोडून पळून जाते ती. (हंसतो).

विमल––मग मी काय करावं म्हणता तुम्ही? एकदां सांगून टाका! तिनं खोटं बोललं तर तिला बोलूं देऊं? खोटी वागली तर वागूं देऊं? उद्या आणखीन कांहीं तिनं केलं, तर–तुमच्या आणि माझ्या तोंडाला काळं फासेल ती!

वसंत––हे बघ. प्रत्येक गोष्टींचीं अशीं आगाऊच भीषण चित्रं रंगविण्याचं कांहीं कारण नाही. आणि तसंच म्हटलं, तर खऱ्या खोट्याची मृदुलेला जी समज आहे ती तुला नाही––

विमल––काय बोलणं हें! आज गुडघ्यायेवढ्या पोरीसाठी तुम्ही काय काय ऐकवणार आहांत मला, तें ऐकूं तरी द्या!

वसंत––तुझी हौस आहे तर माझी ना नाही! तूं ऐकणार असशील, तर एक गोष्ट सांगतों मी तुला.

विमल––ऐकतें आहे. सांगत चला!

वसंत––मघा तूं बोलावलंस, तेव्हा मृदुला काय म्हणाली होती आठवतं? ती म्हणाली कीं तुला ओ दिली असती तर तिला ऐकूं आलं हें तुला कळलं असतं. यांत ऐकूं आल्याचं कळल्यावर मग खोटं वागता येत नाही ही जाणीव होती ना तिला? मी म्हणतों ही जाणीव काय कमी आहे? तिच्या दृष्टीनं ओ न देण्यांत त्यामुळं कांहीं चूक झाली नाही. असं तिला वाटतं होतं. लहान मुलांची सत्यं हीं अशीं सरळ आणि प्रामाणिक असतात! आणि पुन्हा तुझी मध्येंच मुद्दाम खेळांतून उठविण्याची संवय तिला माहीत नसती, तर...

विमल––मुद्दाम उठविण्याची!

वसंत––हो हो. अशी संवय नसती तर तुझ्या दृष्टींतूनहि तिला खोटं बोलायला काही कारण पडलं नसतं...

विमल––ठीक आहे. मग आतां असं करा. मुलगी कांही माझी एकटीचीच नाही. तिच्या भल्याबुऱ्याची जबाबदारी तुमच्यावरहि आहे. आतां माझ्याऐवजी तिच्या प्रत्येक गोष्टींत तुम्हीच लक्ष घाला म्हणजे झालं....

वसंत––बरं––(हंसत) पण मला हें सांग मघा खेळांतून तिला मुद्दाम उठविण्याचं कारण काय होतं?

विमल––मला तशी संवयच आहे. मघाच नाही कां तुम्ही सांगीतलत् तें.

वसंत––अग पण तूंहि आतां लहान मुलासारखीच करायला लागलीस बघ. खरं सांग, कुठं बाहेर घेऊन जाणार होतीस तिला?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विमल--हो.

वसंत--कुठे ?

विमल—बालक मंदिरांत !

वसंत—काय आहे तिथं !

विमल—वार्षिकोत्सव ! निरनिराळ्या वयाच्या मुलांच्या आरोग्याची व बुद्धिमत्तेची स्पर्धा आहे !

वसंत—मग सगळेच माझं चुकलं हं. मृदुलाला गेलेच पाहिजे. मी हांक मारूं कां तिला ?

विमला—आतां कशाला हांक मारता ? पांच मिनिटं सुद्धा उरलीं नसतील ! जाणार केव्हां ! पोचणार केव्हां !

वसंत—नाही ग. मी मोटारींतून पोचवून देतों तुम्हांला. आपली पोर अतिशय बुद्धिमान आहे. आपल्याला माहीत आहे तें. तुम्ही दोघी गेलंच पाहिजे.

विमल—मग हांक मारुन पाहा. असेल तिची मर्जी तर येईल ती.

वसंत—मृदुल ऽ ए मृदुल-

मृदुल—(रडत स्फुंदत येते) बाबा हो ऽ–

वसत—काय झालं मृदुला ! पडलीस कां तूं कुठं ! शी ऽ शी ऽ अग हें काय ! हे कपडे कसे खराब झाले तुझे ! कुठं गेली होतीस ?

मृदुला--किनई ऽ किनई ऽऽ (रडतांना सांगत नाही फारसं)

वसंत--काय किनई ? अग नीट सांगशील तर-कपडे खराब कशानं झाले तुझे ? आणि हा ओरखडा कसा लागला तोंडाला तुझ्या ?

मृदुला—त्या त्या सुधीरनी मला ढकललंन्-मारलंन्....

वसंत—अग पण कां मारलन् त्यानं तुला ? तूं भांडायला गेलीस कशाला त्याच्याशी ?

मृदुला—मी भांडायला गेलेंच नाही मुळी त्याच्याशी

वसंत —मग ऽ

विमल— मृदुल, कुठं लागलं बघूं तुला ! ही तेलाची पट्टी लावूं या त्याच्यावर आपण.

मृदूल – हट्, तूं नको बांधू पट्टी मला.

वसंतराव—(रागानं) मृदूल, काय आहे हें ? रक्त येतंय तर पट्टी नको कां बांधायला !

मृदुला—पण आई कां बांधते !

वसंत--मग कोण बांधेल तर ?

मृदुला--मग तिच्यावरनंच सुधीरनं मारलं आम्हांला ?

वसंत--आईवरनं ? तुझ्या आईवरनं सुधीरनं तुला मारलं !

मृदुला०-हो ! आईटली--खाय पिठली--

वसत--(रागानं) मृदूल !

विमला--(चिडून) छान ! चांगली नांव काढशील आईचं तूं.

वसंत—मृदुला, आईला असं पुन्हां बोलशील तर पहा हं ! तुझ्या आईनं सुधीरला मारायला सांगितलं होतं वाटतं ?

 मृदुल—पण आईवरनंच तर त्यानं मला पहिल्यांदा ढकलन् की.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वसंत—अग पण तुमचं भांडण काय झालं मला सांगशील कीं नाही ? काय म्हणाला होता सुधीर तुला ?

मृदुल—किनई ऽऽ आम्ही सगळेजण खेळ संपवून गोष्टी करत होतों. तर पमी म्हणाली ग काय ग मृदुला तुला तुझी आई जास्त आवडते कां बाबा ? आपल्याला तर दोन्ही आवडतात बाई ! तर मी म्हणालें, मला आमचे बाबाच जास्त आवडतात ! हो कीं नाही हो बाबा ? तुम्हीच जास्त आवडतां कीं नाही मला ?

वसंत—बरं बरं, पुढं सांग काय झालं तें ?

मृदुला—पण मग किनई ऽ–सुधीर उगीच मध्यें बोलला चोमड्या–सारखा. तो म्हणाला ऽ– वा ग वा ! सगळ्यांत आईच जास्त आवडत असते आपल्याला. ज्या मुलीला आपली आई आवडत नाही ती मुलगीच वाईट ! असं कां म्हणाला हो तो ?

वसंत—बरोबर होतं त्याचं. तूं कां म्हणालीस मग तसं ?

मृदुला—पण मग खरं तेंच बोललें ना मी !

विमल–(कळवळून) आई ऽ ग !

वसंत—बरं आणखी मग सुधीर काय म्हणाला त्यावर ?

मृदुला—मग किनई, सुधीर चिडवायला लागला हो मला ! तो म्हणाला, आपल्याला तर मृदुलाची आईच आवडते बुवा. मृदुलाचे बाबा अगदी वाईट आहेत. काय त्यांची ती मोटार काय त्यांची ती हॅट–असं म्हणाला बाबा म्हांला तो !

वसंत—मग तूं काय केलंस ?

मृदुला—मी त्याला म्हटलं, "आमच्या बाबाना असं म्हटलंस तर सांगून ते हं" तर त्यांनीच मला धक्का दिलान्.

वसंत—आणि मग तूं काय केलं ?

मृदुला—मी काठी मारलीन् त्याला हातांतली ! तर त्यानं मला पुन्हां येऊन ललंन्. पहा न बाबा किती लागलंय् मला—

वसंत—बरं बरं, मग आतां आपण त्याला पट्टी लावूं हं.

मृदुला—पण आई कां लावते पट्टी ?

वसंत—तुला आईकडूनच लावून घेतली पाहिजे पट्टी. विमल, इकडे

विमला—(रडक्या स्वरांत) तुम्हीच लावा पट्टी तिला !

वसंत—विमल ! तूं सुद्धां लहान आहेस कां तिच्यासारखी !

मृदुला—बाबा ! आई रडते कां हो ?

वसंत—तुला खरचटलंन् म्हणून डोळ्याला पाणी आलं तिच्या !

मृदुला—हो कां ग आई !

विमला—(करुण दृष्टि)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वसंत--हें बघ, मृदुल, पाय कर तुझा पुढं. अस्सं. आईला किनई बरं नाही तुझ्या. पण तुला घेऊन तिला बालकमंदिरांत जायचं आहे. तिथं मुलांची परीक्षा आहे. सगळ्या आया आपल्या मुलांना घेऊन येतील तिथं. तूं येतेस ना ! जी मुलगी डॉक्टरांच्या प्रश्नाना खूप चांगली उत्तरं देईल, तिला बक्षीस वाटणार आहेत तिथं. तूं आईबरोबर जायचं तिथं हं--

विमल--राहूं द्या आतां. झाली तेवढी पुष्कळ झाली शोभा.

मृदुला—बाबा, आई रागावली आहे कां हो माझ्यावर !

वसंत — हो !

मृदुला—कां रागावली हो !

वसंत—तूं तिचं ऐकत नाहींस म्हणून.

मृदुला—पण बाबा नेहमी कुठं नाही ऐकत हो मी !

वसंत—पण जेव्हां ऐकायला पाहिजे तेव्हांच ऐकत नाहीस तूं !

मृदुला – हट्.

वसंत—हट् तर मग मीहि तुझ्याशी बोलणार नाही !

मृदुला--बाबा ऽऽ--

वसंत--मग ! आतां हें बघ आपल्याला उशीर होतो आहे आधी तूं आपला नवा फ्रॉक बूट मोजे सगळं घाल बघूं. छान चक्क तोंड धूवून यायचं. तूं जाशील ना बालकमंदिरांत !

मृदुला—पण आई येती आहे कां हो !

वसंत—हो ऽ --

विमल—नाही, मी येत नाही ! तुम्हीच घेऊन जा तिला.

मृदुला--आई ऽ तूं कां येत नाहीस ग. मी चांगली उत्तरं देईन डॉक्टरांना, मग बक्षीस ना ग मिळेल आपल्याला ! मग सगळीजणं तुला आणि मला शाबासकी देतील. आई, चल ना ग !

विमल—नाही ग. तूं बाबांबरोबर जा आपल्या. माझं डोकं दुखतं आहे फार.

मृदुला—आई कुठं दुखतंय ग डोकं तुझं ! तूं खोटं बोलतेस ! मी बाबा आवडतात असं म्हटलं म्हणून रागावलीस तूं माझ्यावर !

विमल—नाही ग. तुझ्यावर कशाला रागावूं !

मृदुला--मग तूं रडत कां होतीस ! मला खरचटलं, रक्त आलं म्हणूनच कां ग !

विमल—हो. हो ग.

मृदुला--मग आई तूं पण मला आवडतेस. खरंच खूप आवडतेस ग. आई ऽ...

विमला--मृदुला ऽऽ !

(--ऑल इंडिया रेडिओ नागपूरच्या कृपेने.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघ वार्ता

संमेलनाची पूर्वतयारी--विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाचें १३ वें अधिवेशन अकोला येथे एप्रीलच्या पहिल्या आठवड्यांत भरण्याचें निश्चित झालें आहे. संमेलनाची पूर्व तयारी करण्यासाठीं सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. ब्रिजलालजी बियाणी यांच्या अध्यक्षतेखाली अस्थायी समिति स्थापन झाली असून, संघाचे एक कार्यवाह श्री. प्र. ना. खोडे हेच या समितीचेहि कार्यवाह आहेत.

विदर्भ साहित्य मंदिरासाठीं जागा--मध्यप्रदेश सरकारने संघाच्या मागणीनुसार नागपूर येथें अंबाझरी-वर्धा या दोन रस्त्यांच्या सांध्यावरील ०.७५ एकर म्हणजे सुमारें ३२,००० चौरस फूट जागा मंजूर केली होती. पण, नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टचे जे निर्बंध दोन मोठ्या रस्त्यांच्या सांध्यावर असलेल्या या जागेला लागू पडतात, त्यामुळे संघाच्या वाढत्या व्यापाला ही जागा अपुरी पडेल, असें नंतर समजून आलें. म्हणून सरकारकडे आणखी जागेची मागणी करण्यांत आली. ही मागणी मंजूर होऊन संघाला आता सुमारें १.२० एकर म्हणजे ५२,५०६ चौरस फूट जागा मिळण्याचें निश्चित झालें आहे. ही जागा मिळवून देण्याच्या कामीं शिक्षणमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र आणि शिक्षणखात्याच्या पार्लमेंटरी सेक्रेटरी सौ. विमलाबाई देशपांडे व श्री. लक्ष्मीदेवी धीरेन कन्या विद्यालय सोसायटीचे कार्यवाह श्री. मदनगोपालजी अग्रवाल यांनी जो समंजसपणा दाखविला, त्याचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करणें आवश्यक आहे. या जागेच्या मंजुरीसंबंधीचे तांत्रिक विधी उरकून तिचें रजिस्ट्रेशन झाल्यावर मंदिराच्या उभारणीला प्रारंभ होईल.

ग्रँटसंबंधी वाटाघाटी--मध्यप्रदेशाच्या शिक्षणखात्याचे कार्यवाह डॉ. वेणीशंकर झा यांनी ता. ७ डिसेंबर १९५० रोजीं संघाध्यक्ष श्री. माडखोलकर, कोषाध्यक्ष श्री. ढवळे आणि कार्यकारी सदस्य श्री. ए. श्री. पटवर्धन यांना सचिवालयांत बोलावून त्यांच्याशी ग्रँटबाबत चर्चा केली. याचवेळीं त्यांनी मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलनाचे उपाध्यक्ष डॉ. बलदेवप्रसाद मिश्र, मंत्री श्री. जयचंद्र आणि अर्थमंत्री श्री. के. पी. मिश्र यांनाहि चर्चेसाठीं बोलावून मध्यप्रदेशांतील या दोन्ही साहित्यसंस्थांच्या गरजा, कार्यव्याप, धोरण आणि सहकारितेची दिशा यासंबंधी विचार विनिमय केला. त्याचप्रमाणें या दोन्ही संस्थांच्या प्रत्येकीं ५ अशा एकूण १० प्रतिनिधींची समिति नेमण्यांत यावी व तिने दोन्ही भाषांची संयुक्त अॅकॅडमी स्थापन करण्याची योजना तयार करावी, अशीहि सूचना डॉ. झा यांनी केली. डॉ. झा यांच्या मागणीनुसार विदर्भ साहित्य संघाच्या जमाखर्चासंबंधीचें पत्रक त्यांना सादर करण्यांत आलें.

वैदर्भी रीति आणि रीतिशास्त्र यांवर चर्चा--अकोला येथील अधिवेशनांत अमरावतीच्या श्री शिवाजी महाविद्यालयांतील संस्कृतचे प्राध्यापक श्री. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या वैदर्भी रीतिवरील विस्तृत प्रबंधाच्या अनुषंगाने वैदर्भी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रीति आणि एकंदर रीतिशास्त्र (style) यावर चर्चा व्हावी अशी योजना आहे. या चर्चेत भाग घेण्याचें निमंत्रण (१) प्रा. डॉ. के. ना. वाटवे, पुणें, (२) प्रा. रा. श्री. जोग, पुणें, (३) प्रा. द. के केळकर, मुंबई, (४) प्रा. वि. ह. कुळकर्णी, मुंबई, (५) प्रा. वा. ल. कुळकर्णी, मुंबई, (६) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, नागपूर, (७) प्रा. डॉ. वि. भि. कोलते, नागपूर, (८) प्रा. श्री. भा. वर्णेकर, नागपूर, (९) प्रा. वि. प्र. मोहगांवकर, वाशिम, (१०) प्रा. दा. ल. अडोणी, सागर, (११) प्रा. नंददुलारे वाजपेयी, सागर आणि (१२) प्रा. डॉ. पी. एस्. शास्त्री, सागर, यांनी स्विकारलें आहे. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे हे या चर्चा विभागाचे अध्यक्ष राहतील. या चर्चा विभागांत जे निबंध वाचण्यांत येतील, ते निबंध प्रा. देशपांडे यांचा मूळ प्रबंध आणि समारोप यांसह नंतर स्वतंत्र ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. या चर्चा विभागांत वाचण्यासाठीं जर कोणाला निबंध पाठवावयाचा असेल, तर तो त्यांनीं ता. १५ जानेवारी १९५१ पर्यंत श्री. रा. पु. सगदेव, चिटणीस विदर्भ साहित्य संघ, प्रभानिवास, जेलरोड, नागपूर नं. १, या पत्यावर पाठवावा. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचा वैदर्भी रीतिवरील प्रबंध नागपूर येथील 'तरुण भारत' दैनिकाच्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

नागपूर नं. १
ता. १८-१२-५०

रा. पु. सगदेव,
चिटणीस,
विदर्भ साहित्य संघ.

☆

मध्यप्रदेशाची राजभाषा

ता. ३ नोव्हेंबर १९५० रोजीं मध्यप्रदेश सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालेलें राजभाषेसंबंधीच्या कायद्याचें अधिकृत सरकारी मराठी भाषांतर अक्षरशः पुढे दिलें आहेः—

नागपूर, दिनांक १ नोव्हेंबर १९५०

मध्यप्रदेश विधानसभेच्या खालील अधिनियमास, प्रांतपतीची अनुमति दिनांक २७ आक्टोबर १९५० ला मिळाल्यावरून तो सर्वांचे माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

मध्यप्रदेश प्रांतपतींच्या आज्ञेवरून,
पं. द्वा. देशमुख, सचिव

मध्यप्रदेश अधिनियम, १९५० चा २४ वा

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०

[प्रांतपतीची अनुमती दिनांक २७ आक्टोबर १९५० ला मिळाली. दिनांक ३ नोव्हेंबर १९५० च्या मध्यप्रदेश सूचनापत्रांत अनुमती प्रथम प्रसिद्ध करण्यांत आली.]

१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश राज्याकरिता राजभाषा जाहीर करण्यासाठी अधिनियम

प्रस्तावना

ज्या अर्थी मध्यप्रदेश राज्याच्या सरकारी कामांसाठी वापरण्याकरिता हिंदी व मराठी या भाषा स्वीकारण्याची तरतूद करणें इष्ट आहे;

त्या अर्थी या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे:—

लघु संज्ञा व व्याप्ति

१. (१) या अधिनियमास मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम, १९५०, असें निर्देशावें.

(२) तो संपूर्ण मध्यप्रदेशास लागू आहे.

व्याख्या

२. विषयांत अगर संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसेल तर या अधिनियमांत " हिंदी " म्हणजे जिची लिपी देवनागरी आहे अशी हिंदी आणि " मराठी " म्हणजे जिची लिपी बालबोधी आहे अशी मराठी.

राज्याच्या सरकारी कामांसाठी राज्यभाषा

३. (१) यापुढे केलेल्या तरतुदीत पात्र राहून हिंदी आणि मराठी या सर्व कामासाठीं त्या राज्याच्या राजभाषा राहतील.

(२) अधिसूचनेंत निर्देशिलें असेल त्या कोणत्याहि प्रदेशांत आणि निर्देशिलें असेल त्या तारखेपासून निर्देशित केलें जाईल त्या सरकारी कामाकरितां हिंदी किंवा मराठी अथवा या दोन्ही भाषा वापरल्या जातील, असें अधिसूचनेद्वारे फर्माविण्याचा राज्यसरकारास अधिकार आहे.

विधेयकें वगैरेंत वापरण्याची भाषा

४. पुढील बाबींसाठी वापरण्याची भाषा ही, राज्यसरकार त्यांपैकी प्रत्येक बाबतींत अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या तारखेस व तेव्हांपासून, हिंदी राहील:—

(अ) राज्यविधानसभेंत सादर करावयाचीं सर्व विधेयकें व त्यांसाठी मांडावयाचीं सर्व संशोधनें;

(ब) राज्य विधानसभेनें संमत केलेले सर्व अधिनियम,

(क) भारत संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये जारी करावयाचे सर्व अध्यादेश ;

(ड) भारत संविधानान्वये किंवा संसदेने अथवा राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य सरकारने काढलेले सर्व हुकूम, नियम, नियमनें आणि पोटकानू.

x x x

राष्ट्रपतींची मान्यता मिळावयाची आहे

या कायद्याला अद्याप भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांची संमति मिळावयाची आहे. ती मिळाल्यावरच हा कायदा अंमलांत येईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घटना दुरुस्ती

*

ता. २६-११-१९५० रोजी भरलेल्या साधारण सभेंत नेमलेल्या घटना समितीच्या सभासदांची बैठक ता. १७-१२-१९५० रोजी भरली. आलेल्या सर्व सूचनांचा विचार होऊन घटनेंत पुढील दुरुस्त्या अविरोध सुचवण्यांत आल्या. या बैठकीला पुढील सभासद हजर होते :—(१) प्रा. श्री. ना. बनहट्टी, (२) श्री. गं. सा. सहस्रबुद्धे (३) प्रा. ग. त्र्यं देशपांडे, (४) डॉ, मा. गो. देशमुख आणि (५) प्रा. डॉ. वि. भि. कोलते.

मूळ घटनेंत सुचवलेले बदल

नियम २ ' व मराठवाडा ' हे शब्द गाळावे.

" ५ ' अमरावती (वऱ्हाड) ' या ऐवजी 'नागपूर' शब्द घालावा.

'दप्तर व कचेरी दुसरीकडे' या ऐवजी 'चालू कामकाजाचें दप्तर' हे शब्द वाचावे.

" ६ ओळ १ 'आठ' ऐवजी 'सात' शब्द वाचावा.

" ६ 'वर्ग (१)' गाळावे. 'रुपये ५' ऐवजी 'रुपये ३'.

" ७ संपूर्ण ओळ गाळावी.

टीप पुढील प्रमाणे वाचावी 'प्रकार ५. साधारण सभासद यांनी ५० रु. एकदम किंवा सहा महिन्याच्या आंत दिल्यास त्यांना तहाहयात साधारण सभासद होता येईल.

ओळ ११ "(७)" ऐवजी "(६)" वाचावें.

" १२ "(८)" " "(७)" वाचावें.

नियम ७ "पंधरा दिवसांच्या आंत कार्यकारी मंडळाने" या ऐवजी "एक महिन्याच्या आंत सरचिटणीसाने" हे शब्द घालावे.

" ८ "अगर निवडणुकींत" हे शब्द गाळावे.

" ९ "त्यास संघाचें नियतकालिक मिळणार नाही आणि सभासदास मिळणाऱ्या इतर कोणत्याहि सवलती मिळणार नाहीत" हे वाक्य जोडावें.

" १० "सभासदांस या शब्दापुढे "सरचिटणीसाने" हे शब्द घालावे. "देऊन कार्यकारी मंडळास" या शब्दांऐवजी "दिल्यावरीह पूर्ण बाकी न दिल्यास."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नियम १२ "दोन" ऐवजी "एक"

,, १६ "सात दिवस" या ऐवजी "चार दिवस."

,, १९ (ऊ) मराठी भाषा व साहित्य यांचें अध्ययन, अध्यापन व परीक्षा यांची व्यवस्था करणें.

(ए) प्राचीन व अर्वाचिन हस्तलिखितें व ग्रंथ यांचा संग्रह करणें.

(ऐ) या ठिकाणी जुनें (ऊ) कलम घालणें.

(ओ) संघाच्या कोणत्याहि व्यवहारासंबंधी तपशीलाचे पोट नियम करणें.

(औ) संघाच्या भिन्न भिन्न कार्यासाठी अवश्य तेथे समित्या अगर पोटमंडळें नेमणें.

नियम २२ "सहा" ऐवजी "पांच" शद्ब

नियम २६ "संपादक" या शद्बाखाली "संचालक, परीक्षा समिति "१" आणि त्याखाली सभासद '७' ऐवजी '६'.

निवडणुकी

नियम २७ यांत व इतरत्र 'सभासद' ऐवजी 'मतदार सभासद' वाचावें. निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याचा व मत देण्याचा अधिकार संघाचे लागोपाठ व पूर्ण दोन वर्षें सभासद असणाऱ्यांनाच राहील. यांना मतदार सभासद म्हणून संबोधलें जाईल.

,, २८ कार्यकारी मंडळ दर तीन वर्षांनी निवडलें जाईल. निवडणुकीच्या आधी एक महिना मतदार सभासदांकडून निवडणुकीतील जागांसाठी सूचितांची नांवें अनुमोदनासह मागवण्यांत येतील. सूचना करणाराने सूचितांची अनुमती मिळविली असल्याबद्दल कचेरीकडे लेखी कळविलें पाहिजे. सरचिटणीसांनी सूचित उमेदवारांच्या यादीसह मतदान पत्रिका मतदारांकडे निवडणुकीच्या दिवसाच्या निदान पंधरा दिवस आधी रवाना केल्या पाहिजेत.

" २९ मतदार सभासदांची पूर्ण यादी निवडणुकीच्या अगोदर दोन महिने संघाच्या नियतकालिकांतून प्रसिद्ध व्हावी. त्रैवार्षिक निवडणुकीसाठी कार्यकारी मंडळास अगर साधारण सभेस निवडणूक मंडळ नेमावेसें वाटल्यास त्यांना तसे करण्याचा अधिकार राहील.

द्रव्यनिधि व मालमत्ता

,, ३१ (अ) "वर्ग १ व २" हे शद्ब गाळावें. "आणि संघाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचें उत्पन्न, चालू खर्चासाठी योग्य ती रकम बाजूला ठेवून राहिलेली परीक्षा समितीची शिल्लक आणि २५ रुपयांवरील सरकारी ग्रँट व इतर देणग्या" हें जोडावें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(आ) "वर्ग १ व २" हे शब्द गाळावे. 'किरकोळ' हा शब्द गाळावा त्या जागी '२५ रुपयांच्या खालील देणग्या' असें वाचावें.

३७ 'ठिकाणी' नंतर 'कार्यकारी मंडळीच्या संमतीने' जोडावें.

संमेलन

४३ 'दरवर्षी भरवण्यांत येणाऱ्या संमेलन प्रसंगी सन्माननीय पाहुणे म्हणून भाषणासाठी एखाद्या श्रेष्ठ साहित्यिकाला आमंत्रण देण्यांत यावें. कार्यकारीमंडळाने पाहुण्यांची तीन नांवे बहुमताने सुचवावीं व त्यांतून कुणाहि एकाला आमंत्रण देण्याचा अधिकार, ज्या गांवी संमेलन भरणार असेल तेथील स्वागतमंडळाला असावा. संमेलनाच्या तारखांपूर्वी एकमहिना अगोदर सन्माननीय पाहुण्यांचें नांव निश्चित व्हावें.' ही वाक्यें जोडावीं.

,, ५० 'परंतु जरूर पडल्यास' या वाक्याऐवजी 'सन्माननीय पाहुण्याच्या प्रवासाचा व भाषणाच्या छपाईचा खर्च स्वागतमंडळानेच करावा.

,, ५४ 'आठव्या' ऐवजी 'सातव्या.'

,, ५७ 'संघाच्या सर्व सभासदांस संघाचे नियतकालिक विनामूल्य पाठवण्यांत येईल. संघाच्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या सर्व सूचना रीतसर समजण्यांत येतील. सभासदांकडे त्या पुन्हा स्वतंत्र रीतीने पाठवल्या जाणार नाहीत.

रा. पु. सगदेव,
चिटणीस,
विदर्भ साहित्य संघ.

नागपूर ता. २१-१२-१९५०

मराठी गद्य

विदर्भ साहित्य संघाने प्रसिद्ध केलेल्या मराठी गद्य या पुस्तकाची पुरवणी 'टिपणें' छापून तयार झालेलीं आहेत. ता. ३१ डिसेंबर १९५० पूर्वी ज्यांनी हें पुस्तक विकत घेतलें असेल त्यांना तीं विनामूल्य मिळतील. विद्यार्थ्यांनी तीं आपापल्या बुकसेलर्स कडून घ्यावीं आणि बुकसेलर्सनी 'अरुण प्रकाशन, मलकापूर' यांचेकडून ती आपापल्या बिलाचा अनुक्रम कळवून मागवावीं. पोस्टेजचा खर्च मात्र बुकसेलर्सना द्यावा लागेल.

रा. पु. सगदेव,
चिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

नागपूर ता. २२-१२-५०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

युगांतरीं एक युगप्रवर्तक
विश्वीं अवतरे युगवाणी गात !

देवाची लाडकी दुःखाने गांजली
वंद्य हिंद माता हीन दीन झाली !

फेडाया मातेचें पांग ये धांवुन
युगप्रवर्तक महात्मा मोहन !

विश्वाच्या कल्याणा सत्यअहिंसेची
गातो युगवाणी नवलपरीची !

दिपूं नका तेजें होऊं नका मूढ
विवेकें उकला युगवाणी गूढ !

विश्वाचें कल्याण
तीच युगवाणी !
निःशस्त्र अंबिका
करील निदानीं !

—नारायण माधवराव सटपटवार

पत्रव्यवहाराचा पत्ता :

युगवाणी कार्यालय, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ